# मेहता मराठी ग्रंथजगत

मार्च, २०२३

पृष्ठे ६८ किंमत : रु.१५

वर्ष तेविसावे

अंक तिसरा




आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रें यत्न करूं ।।
शब्दचिं आमुच्या जीवाचें जीवन । शब्दें वाटू धन जनलोकां ।।
तुका म्हणे पाहा शब्दचिं हा देव । शब्देचिं गौरव पूजा करूं ।।

# पुरस्कारासाठी आवाहन



'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यात येणार आहे. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत केली गेली.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

## 'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**२०,०००/-**



पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१. १ जानेवारी, २०२३ ते ३० सप्टेंबर, २०२३ दरम्यान प्रकाशित झालेली पहिली साहित्यकृती या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

२. १ ऑक्टोबर, २०२३ ते १ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत पुरस्कारासाठीचे अर्ज स्वीकारण्यात येतील.

या पुरस्काराची घोषणा जानेवारी २०२३ मध्ये केली गेली असून १२ जानेवारी, २०२४ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. तरी इच्छुक साहित्यिकांनी आपले साहित्य मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पत्त्यावर पाठवावे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ मार्च २०२३ ◆ वर्ष तेविसावे ◆ अंक तिसरा

**संपादक :**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक :**
शंकर सारडा

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा
ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*

*— अनुक्रमणिका —*

| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **एक एक पान घडताना...** | **९** |
| **सांस्कृतिक** | **१४** |
| **पुरस्कार** | **१७** |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| द लॉस्ट सिटी ऑफ Z | १८ |
| द वुमन इन द विंडो | २४ |
| रहस्य प्राचीन नटराजाचे | ३४ |
| ऋणानुबंध | ४० |
| ऑनर अमंग थीव्हज | ५० |
| **अभिप्राय** | **५६** |
| **दिनविशेष** | **६०** |

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

स<br>पा<br>द<br>की<br>य

# साहित्य संमेलन : अधिक-उणे

*'नेमेचि येतो मग पावसाळा'* या उक्तीप्रमाणे गाजावाजा करत आयोजित केलेल्या ९६व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे सूप फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात वाजले. साहित्य संमेलन म्हटले की, त्यावर समाजमाध्यमांवरून खुमासदार चर्चा-प्रतिचर्चा आल्याच. उण्यापुऱ्या १४५ वर्षांचा इतिहास असलेल्या व लवकरच शतकमहोत्सव साजरा करणाऱ्या या संमेलनांचं फलित काय, हा प्रश्न दरवर्षी काही काळ ऐरणीवर येतोच. त्यावर चर्चा होतात, वाद होतात; पण पुन्हा हे सर्व बासनात गुंडाळले जाते.

'साहित्य संमेलन' म्हणजेच 'सारस्वतांचा मेळा.' संमेलन हे विचार व्यक्त करायचे एक व्यासपीठ. साहित्यविषयक घडामोडी, परिसंवाद, साहित्यातील प्रवाह यांवर खुली चर्चा करण्याची पर्वणी ही संमेलनाच्या माध्यमातून मिळत असते. संमेलनं ही मराठी साहित्य संस्कृतीचं एक महत्त्वाचं अंग असून, त्यातून सांस्कृतिक देवाण-घेवाण होत असते. साहित्य संमेलनाच्या निमित्ताने साहित्य व्यवहारातल्या अर्थचक्राला चालना मिळत असते.

साहित्य संस्था आणि साहित्य महामंडळ यांच्या परस्पर सहकार्याने साहित्य संमेलनाचे आयोजन केले जाते. या संमेलनांची कोटीच्या कोटी उड्डाणे सुरू झाल्यापासून, सामान्य वाचक यापासून दूर चाललाय का, असा एक प्रश्न या निमित्ताने पडतो.

साहित्य व्यवहारात लेखक, प्रकाशक, ग्रंथविक्रेता, वाचक अशी साखळी असते. या साखळीत सुसूत्रता आली तर साहित्य संमेलने अधिक यशस्वी होतील, असं वाटतं. त्यात अनेक उपघटकही मोडतात, जसे की मुद्रितशोधक, टंकलेखक, संपादक, मुद्रक इ. या सर्वांची एक साखळी आहे; जी साहित्य व्यवहारात एकमेकांवर अवलंबून आहे. यात समन्वयाचा अभाव आहे, असं दुर्दैवाने म्हणावं लागेल. या घटकांना जमेत धरून साहित्य महामंडळाने संमेलनं आयोजित केली तर निश्चितच एक चांगला पायंडा पडेल व त्याचा फायदाही झालेला पाहायला मिळेल.




संमेलन म्हटलं की जसे-साहित्यविषयक कार्यक्रम आले तसेच ग्रंथप्रदर्शन व ग्रंथविक्री हेही आलेच. वस्तुस्थिती मात्र नेमकी काय, याकडे कुणाचे लक्ष जात नाही, ही खेदाची बाब म्हणावी लागेल. प्रसारमाध्यमांनी चार दिवस कोलाहल केला, की तेवढ्यापुरतेच त्यांचे कवित्व. याचा संमेलनाच्या ठिकाणावर जाऊन कुणी अभ्यास केला असेल का? आणि जर केला असेल व त्यांतून काही उपाय सुचवले असतील तर त्याची कार्यवाही पुढे झाली का? असे अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत.

साहित्य व्यवहाराचा एक घटक म्हणून प्रकाशक तसेच ग्रंथ वितरक, पुस्तक विक्रेते यांनाही संमेलनाच्या संयोजनात सहभागी करून घेतल्यास जी आव्हाने वा जे प्रश्न उभे राहतात त्यावर काही अंशी तोडगे निघतील, अशी आशा करायला हरकत नाही. अशा बऱ्याच गोष्टी आहेत ज्याचा विचार सकारात्मक व चांगल्या पद्धतीने झाला तर त्याचा फायदा होऊ शकतो.

साहित्य संमेलनाचं उत्सवी स्वरूप आणि त्यातून हरवत चाललेला साहित्याचा आत्मा ही विसंगती अरविंद बुधकर यांनी त्यांच्या चारोळीतून टिपली आहे.

*वर्षानुवर्षे चाले सोहळा*
*कीर्तनाचा रंग वेगळा*
*दिंडी ग्रंथांची निघे रंगात*
*कच्चे मडके, रडे कुंभार मनात*



## फॉर्म ४ – वृत्तपत्राच्या मालकी हक्कांसंबंधीचे निवेदन

| | | |
|---|---|---|
| १) नियतकालिकाचे नाव | : | मेहता मराठी ग्रंथजगत |
| २) प्रकाशन स्थळ | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |
| ३) प्रकाशन काल | : | मासिक |
| ४) मुद्रकाचे नाव | : | अखिल सुनील मेहता |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |
| ५) प्रकाशकाचे नाव | : | अखिल सुनील मेहता |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |
| ६) संपादक | : | अखिल मेहता |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |
| ७) मुद्रण स्थळ | : | जय गणेश ऑफसेट, २०/१डी/ १ए, सोमवार पेठ, महाराजा लॉजमागे, पुणे ४११ ०११ (महाराष्ट्र) |
| ८) वृत्तपत्राची मालकी हक्क/ स्वामित्व इ. चे नाव | : | अखिल सुनील मेहता |
| कार्यालयाचा पत्ता | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |

मी, अखिल सुनील मेहता, असे घोषित करतो की,वरील तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे विश्वासपात्र व सत्य आहे.

दि. ११.३.२०२३

अखिल सुनील मेहता
प्रकाशक

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

## आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**

**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

## डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**

**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

***Available on***

amazonkindle | Google Play Books

Find us on: facebook®

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

# मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!

## टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक


**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx




नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि अ‍ॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

ebook available on :

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

# ए क ए क पा न घ ड ता ना...



– *अनिल मेहता*

*‘वपुं’नी आपल्या लेखनाने, कथाकथनाने मराठी वाचकांच्या-रसिकांच्या हृदयात अढळ स्थान मिळवलं. अशा या लोकप्रिय लेखकाची आणि अनिल मेहतांची ओळख कशी झाली आणि लेखक-प्रकाशक या संबंधातून त्यांची मैत्री कशी दृढ होत गेली, लेखक म्हणून आणि माणूस म्हणून कसं होतं ‘वपुं’चं व्यक्तिमत्त्व, यावर प्रकाश टाकणारं स्मृतिपुष्प...*

## मैत्र सर्जकांशी

## व. पु. काळे

एक काळ असा होता, की त्या काळात माझ्याकडं जे येईल ते साहित्य मी प्रकाशित करत होतो. सुरुवातीला हा एक खाक्या होता. मला एक छंदच लागला होता,की नवीन कोणीही काहीही ललित साहित्य छापायला दिलं, की ते प्रकाशित करायचं. या माध्यमातून नवोदित लेखकांना मी प्रकाशात आणत होतो. त्यावेळेस एकाने मला विचारले, ‘तुम्ही प्रथितयश लेखकांची पुस्तके का प्रकाशित करत नाही?’ मग मी त्यांना म्हटलं, ‘तुम्ही सुचवा.’ त्यांनी व. पु. काळे यांच्याविषयी सुचवलं.



त्या वेळी माझं वाचन मर्यादित होतं. काही

लेखकांचीच पुस्तकं मी वाचत होतो आणि व. पु. काळे यांचं नाव लेखक व कथाकथनकार म्हणून  नुकतंच पुढं येत होतं. मग मी वेळ मिळेल तेव्हा 'वपुं'च्या कथाकथनाला जाऊ लागलो. मला ती गोडीच लागली. मी त्यांची पुस्तकं वाचली. ती वाचल्यानंतर मला त्यातली आणखी वेगळीच गोडी कळली. हळुवार भावना आणि जीवन- मूल्यांचं अनोखं विश्लेषण मांडणारी अद्वैतशैली म्हणजे वपु! हा माणूस अतिशय चांगलं लिहितो आणि एखादी कथा कशी ट्विस्ट करावी, हे या माणसाला चांगलं जमतं हे माझ्या लक्षात आलं. मी 'वपुं'च्या लेखनप्रेमात पडलो. विशेषतः, 'वपुं'च्या 'घर हरवलेली माणसं'मधील 'यशस्वी होशील म्हणा' ही कथा वाचून मी खूप प्रभावित झालो होतो. ती कथा वाचून झाल्यानंतर मला खूपच तीव्रतेनं वाटून गेलं,की 'वपु' आपले लेखक झाले पाहिजेत आणि तसा योग लवकरच आलाही.

एक दिवस रणजित देसाई त्यांच्या भावाकडं निपाणीला आले होते. तिथं व. पु. काळेंचा कथाकथनाचा कार्यक्रम होता. रणजित देसाई निपाणीला आहेत, हे समजल्यावर 'वपु' त्यांना भेटायला आले होते. तेव्हा मी रणजित देसाईंसोबतच होतो. मी दादांना गळ घालून ठेवली, की 'वपुं'चं एखादं तरी पुस्तक मला प्रकाशित करण्यासाठी मिळवून द्या. त्याप्रमाणं दादांनी तसं त्यांना सांगितलं. तर 'वपु' म्हणाले,''देतो पुस्तक; पण ती  दुसरी आवृत्ती असेल.'' मी 'चालेल' म्हणालो आणि लवकरच त्यांनी त्यांचं 'मोडेन पण वाकणार नाही' हे पुस्तक मला दिलं. मी ते मार्च १९८३मध्ये प्रकाशित केलं. त्यानंतर मला त्यांचं 'चिअर्स' हे पुस्तक मिळालं.

त्या वेळी 'वपु' मला म्हणाले, ''मेहता, हे पुस्तक फास्ट व्हायला पाहिजे.''

मी म्हणालो,''तुम्ही सांगा की, अमुक इतक्या दिवसांत व्हायला पाहिजे.''

ते म्हणाले, ''दोन महिन्यांत व्हायला हवं.''

मी म्हटलं, ''ठीक आहे, करूया.''

दिलेल्या शब्दाबाबतीत मी नेहमीच पक्का असतो. दोन महिन्यांत पुस्तक तयार केलं व ते मुंबईला घेऊन गेलो. मला पुणे-मुंबईच्या प्रवासात वेळ लागला. रात्री साडेअकरा-बाराच्या सुमारास ते पुस्तक मी त्यांना त्यांच्या घरी आणून दिलं  आणि म्हणालो,''तुम्ही म्हणालात, त्या तारखेला मी  पुस्तक देतोय, हे लक्षात ठेवा.'' ते पाहून त्यांना अतिशय आनंद झाला.

'वपुं'च्या 'वपु ८५' या कथासंग्रहाचा प्रकाशन समारंभ अरुण शौरींच्या हस्ते झाल्याचं मला आठवतं. त्या समारंभाला ना. ग. गोरे, एस. एम. जोशी, पु. ल. देशपांडे हे तिघं उपस्थित होते.

त्यानंतर मला एकापाठोपाठ एक त्यांची अनेक पुस्तकं मिळत गेली. त्यांचं-माझं जमत गेलं. कोल्हापूरला ते येत असत. काही वेळा मी दुकान उघडताच एखादा वाचक 'वपुं'चं पुस्तक घ्यायला येई व ते पुस्तक माझ्या दुकानात असे. ते गिऱ्हाईक खूश होई. मी त्वरित 'वपुं'ना फोन करून सांगत असे, 'आज तुमच्या पुस्तकाने बोहनी झाली.' त्यावर तेही खूश होत.

पुण्याला आले की, 'वपु' नेहमी ऑफिसवर येत. गप्पा मारत. 'वपु' कधीही माझ्याकडे रिक्तहस्ते आले नाहीत. येताना काहीतरी वस्तू घेऊन यायचेच. एखादा शर्ट पीस किंवा एखादा पेन असं काहीतरी. मीही 'वपुं'च्या घरी मुंबईला 'साहित्य सहवास'मध्ये बऱ्याचदा गेलो. 'वपुं'चा फ्लॅट तसा छोटा होता; मात्र त्यातली टापटीप आणि स्वच्छता बघत रहावी अशी होती. 'वपु' हा माणूसच अतिशय नीटनेटका, टापटिपीची आवड असलेला होता. ते घर खरोखर अप्रतिम असं सजवलेलं होतं. त्यांच्याकडं एक कपाट होतं, त्यावर एक काच होती. त्या काचेवर अनेक नावाजलेल्या लेखकांच्या पुस्तकांची पेंटिंग त्यांनी पेंटरकडून काढून घेतली होती. त्यांचं लिहिण्याचं एक टेबल होतं. तिथलं पेन, तिथली प्रत्येक वस्तू ही बघण्यासारखी होती. प्रत्येक गोष्टीच्या बाबतीत ते अत्यंत शिस्तीचे होते. औषधाच्या बाबतीतही गोळ्या कुठे ठेवल्यात, त्या केव्हा घ्यायच्या यांची लेबल्स असायची. त्यांच्या घरात एका बॉक्समध्ये वापराच्या काही वस्तू होत्या, त्याला त्यांनी काही गमतीदार नावं दिली होती. त्यात एक भिंग होतं. त्याला त्यांनी नाव दिलं होतं, 'राईचा पर्वत', रबरबॅन्ड होतं त्याचं नाव होतं 'तुटेपर्यंत ताणू नये.' डिक्शनरीला नाव दिलं होतं 'वाघिणीचं दूध.' औषधांचा एक ट्रे होता, त्यात वेगवगळ्या डब्या होत्या. झोपेच्या गोळ्यांच्या डबीचं नाव होतं, 'निद्रानाश.' डोकेदुखीच्या गोळ्यांच्या डबीला नाव दिलं होतं, 'कुटुंब.' डुप्लिकेट चाव्यांच्या डब्याला नाव दिलं होतं, 'जुळ्या बहिणी.' असा हा गमतीशीर माणूस होता.

ते अत्यंत चांगले फोटोग्राफर होते. त्यांनी माझा काढलेला फोटो पाहून माझी पत्नी एकदा म्हणाली, की 'वपुं'कडूनच माझा फोटो काढायचा, आणि 'वपुं'नी तिचा फोटो काढला. तो फोटो माझ्या घरात मी लावलेला आहे. त्यांनी

माझे काढलेले सर्व  फोटो मी जपून ठेवलेले आहेत. एकदा ते दुकानात आले असताना बसल्याबसल्या त्यांनी माझे सात-आठ फोटो काढले. ते फोटो त्यांनी मला लगेच एनलार्ज करून पाठवले होते व त्याच्यासोबत एक चिठ्ठी लिहून पाठवली होती. त्यात लिहिलं होतं, 'आडात खूप आहे, पोहरा अपुरा पडला.' माझ्या एका वाढदिवसाच्या वेळी त्यांनी चिठ्ठी लिहून पाठवली, त्यात लिहिलं होतं, 'भल्याभल्या लेखकांना कनवटीस लावणारा प्रकाशक.' त्यांची जी पत्रं यायची ती खरोखरच अशी वैशिष्ट्यपूर्ण असायची. ती अजूनही आहेत माझ्याकडं. मी ती अधूनमधून वाचतो व त्यांच्या स्मृतींत हरवून जातो. त्यांचं अक्षर इतकं सुंदर, की त्या अक्षरावरच कुणीतरी प्रेम केलं असेल. ते सरळ कधीही लिहीत नसत. ते अक्षराला वेगवेगळं वळण देऊन लिहीत.

बेळगावला दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन आयोजित केलं होतं. त्यातील कथाकथनाच्या सत्राचे ते अध्यक्ष होते. कथाकथन करणारे बरेच जण होते. त्यामुळे कार्यक्रम कंटाळवाणा झाला होता. इतर मान्यवरांनी 'आम्ही हॉटेलवर जातोय,' अशी चिठ्ठी 'वपुं'ना व्यासपीठावर पाठवली. तर त्याच चिठ्ठीवर 'वपुं'नी 'सुखी माणसांचे सदरे माझ्यासाठी ठेवा' असं आपल्या वळणदार अक्षरात उत्तर पाठवलं होतं. त्यांचा हजरजबाबीपणा वाखाणण्याजोगा होता.

'वपुं'च्या सहवासात मी जो काही काळ घालवला तो मी माझ्या आयुष्यातला श्रीमंत काळ होता असं समजतो. काही वेळा मलाच माझं आश्चर्य वाटतं, की कधी काळी ज्यांच्या कथाकथनावर मी फिदा झालो होतो, जे माझ्या प्रकाशनाचे लेखक होतील की नाही, अशी मला शंका होती तेच माझे चांगले मित्र झाले होते.

अनेकदा आम्ही एकत्र त्यांच्या मोटरसायकलवर मुंबईत भटकंती करत असू. त्यांचं कथाकथन झाल्यानंतर आम्ही बाहेरच एकत्र जेवायला जात असू. कुठल्या हॉटेलमध्ये कुठला पदार्थ चांगला मिळतो, हे त्यांना माहिती असायचं. त्यामुळं ऑर्डर त्यांनीच द्यायची हे ठरलेलं असायचं.

जेवता जेवता कथाकथनाच्या वेळचे त्यांचे अनेक किस्से त्यांनी सांगितलेले मला आठवतात. कथाकथनाबाबतीतही त्यांची शिस्त होती. ज्या गावात ते कथाकथन करत तिथं परत जर गेले, तर पहिली कथा पुन्हा कधी सांगत नसत. कोणत्या कथा कोणत्या गावात सांगितल्या आहेत याची व्यवस्थित नोंद ते ठेवत. त्यामुळं प्रत्येक वेळी ते लोकांची मनं नव्यानं जिंकून घेत.

श्रोत्यांचं अमाप प्रेम त्यांना मिळालं. असं असलं तरी एक-दोनदा ते फसवलेही गेले. बाहेरगावी कथाकथनाला घेऊन जाण्यासाठी आयोजक आले; पण सोडायला कोणी आलं नाही. त्यामुळं ते प्रत्येक वेळी असं बघायचे की, आपलं परतीचं तिकीट काढलेलं आहे ना?

'वपु' शिस्तप्रिय होते; तितकेच अतिशय प्रेमळ व  हळवेही होते. त्यांची पत्नी आजारी होती, त्या वेळी मी त्यांच्याकडं गेलो होतो. ते पत्नीचं सगळं करायचे. नंतर पत्नी गेल्यावर त्यांना खूप एकटं एकटं वाटू लागलं. नंतर त्यांना मधुमेहाचा त्रास सुरू झाला. हार्टअ‍ॅटॅकनं ते गेले; पण आजही ते गेलेत असं मला वाटत नाही. मेहता पब्लिशिंग हाऊसमध्ये असलेल्या 'वपुं'च्या समग्र साहित्यातून त्यांचं अस्तित्व आजही वाचक अनुभवत आहेत.

रसिकतेच्या प्रांतात व. पु. काळे माहिती नाहीत, असा रसिक शोधून सापडणार नाही. साठहून अधिक पुस्तकं त्यांनी लिहिली. मला वाटतं, ती सर्वच पुस्तकं आजच्या काळालाही तेवढीच लागू होणारी आहेत. त्यामुळं तरुण वर्गातूनही त्याला तेवढीच मागणी आहे.

◆

## फेटे-तुऱ्यांच्या साजात कोल्हापुरात रंगली मैफल...!

कोल्हापूर ही माझी कर्मभूमी. माझ्या कामाची सुरुवात ही कोल्हापुरातूनच झाली आहे, असे म्हणत महेश कोठारेंनी कोल्हापूरशी असलेल्या जुन्या नात्याला दिला उजाळा...

ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक व लेखक महेश कोठारे आणि सुप्रसिद्ध अभिनेते भरत जाधव ही जोडगोळी म्हणजे त्यांच्या हास्याविष्कारातून रसिक प्रेक्षकांना खळखळून हसवणारी. गेली अनेक दशके आबालवृद्धांसह मराठी, हिंदी व गुजराती चित्रपट-मालिकांतून सिनेरसिकांच्या मनात महेशजींनी अढळस्थान निर्माण केले.आपल्या सर्वांचे लाडके व ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक व लेखक महेश कोठारे 'मेहता पब्लिशिंग हाऊस' तर्फे प्रकाशित झालेल्या 'डॅम इट आणि बरंच काही' या आत्मचरित्राच्या निमित्ताने १५ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ६:०० वाजता कोल्हापूरकरांच्या भेटीला केशवराव भोसले सभागृह, कोल्हापूर येथे आले होते. यानिमित्त सुप्रसिद्ध अभिनेते भरत जाधव यांनी त्यांच्याशी संवाद साधला. कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. तसेच 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक अखिल मेहता व साहिल मेहता आणि पुस्तकाचे शब्दांकनकार मंदार जोशी या वेळी उपस्थित होते. अरुण नाईक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कोल्हापूर आणि मेहता पब्लिशिंग हाऊसच्या अतूट नात्याबद्दलही यावेळी त्यांनी सांगितले.



महेश कोठारेंचे वडील अंबर कोठारे यांचे अलीकडेच दु:खद निधन झाले. कार्यक्रमाच्या

सरुवातीला त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. महेश कोठारेंचा कोल्हापुरी अंदाजात फेटा बांधून तसेच इतर मान्यवरांचा साहिल मेहता यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सुलोचना दीदींचं आपल्या आयुष्यातील महत्त्व, सुरुवातीच्या काळापासून त्यांची झालेली मदत आणि दीदींना महेशजींच्या हस्ते दिलेला पुरस्कार, या आणि दीदींविषयीच्या अनेक गोष्टींना यावेळी महेशजींनी उजाळा दिला.

लक्ष्मीकांत बेर्डेविषयी बोलताना महेश कोठारेंनी अनेक आठवणींना उजाळा दिला. 'लक्ष्याला स्क्रिनवर पुन्हा जिवंत करण्याचा' विचार यावेळी त्यांनी व्यक्त केला.

सिनेमाच्या नावांच्या तसेच सिनेमातील विविध गमतीदार पात्रांच्या नावामागच्या गमतीजमतीही त्यांनी यावेळी सांगितल्या. अभिराम भडकमकर, सचिन पिळगावकर, लक्ष्मीकांत बेर्डे, भरत जाधव अशा अनेकांसोबत काम करतानाचे किस्से यावेळी त्यांनी सांगितले.

डॅडी, जेनमा, आदिनाथ यांच्या अनेक आठवणी यावेळी सांगितल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक अखिल मेहता यांनी केले. पुस्तकाचे शब्दांकनकार मंदार जोशी यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि आभार प्रदर्शन अरुण नाईक यांनी केले.

## चित्रपटसृष्टीचं पाणी तुम्हाला इतर पाणी गोड लागू देत नाही!

गेली अनेक दशके सिनेरसिकांच्या मनात अढळस्थान निर्माण करणारे सर्वांचे लाडके ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक व लेखक महेश कोठारे 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे प्रकाशित झालेल्या 'डॅम इट आणि बरंच काही' या आत्मचरित्राच्या निमित्ताने पुणेकरांच्या भेटीला गुरुवार, दिनांक १६ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ५:०० वाजता क्रॉसवर्ड, सिटी प्राईड, कोथरूड येथे आले होते. या कार्यक्रमास सिटी प्राईड मल्टीप्लेक्सचे प्रमुख-अरविंद चाफळकर व प्रकाश चाफळकर, यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे अखिल मेहता आणि पुस्तकांचे शब्दांकनकार मंदार जोशी या वेळी उपस्थित होते. योजना यादव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. महेश

कोठारेंचे वडील अंबर कोठारे (डॅडी) यांना कार्यक्रमात सुरुवातीला श्रद्धांजली वाहण्यात आली. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक अखिल मेहता यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

एकदा तुम्ही चित्रपटसृष्टीचं पाणी प्यायला तर तुम्हाला इतर कुठलंही पाणी गोड लागत नाही, असे महेश कोठारे यावेळी म्हटले. जसं चित्रपटांच्याबाबतीत नुसतं डिस्ट्रीब्युटर असून चालत नाही तर ते एग्झिक्युटर असायला हवेत. तसेच पुस्तकांच्या बाबतीतही 'मेहता पब्लिशिंग हाऊस' फक्त डिस्ट्रीब्युटर नसून ते एग्झिक्युटर देखील आहेत, असेही ते यावेळी म्हणाले.

'तुम्ही सामाजिक विषयांवर चित्रपट का बनवले नाहीत?' अशा प्रेक्षकांतून आलेल्या प्रश्नावर 'लोकांची निखळ करमणूक करणारे चित्रपट करणं, ही-सुद्धा एक प्रकारची समाजसेवाच आहे.' असं मार्मिक उत्तर कोठारेंनी यावेळी दिलं. तसेच फोरट्रॅक मॅग्नेटीक तंत्रज्ञानाचा वापर करून बनवलेला 'धडाकेबाज' हा पहिला मराठी चित्रपट असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केलं.

'सहा दशकांच्या यशस्वी कारकिर्दीच्या अभिनेत्याच्या आयुष्यावर लिहायला मिळणं हे माझं भाग्यच!' असं मंदार जोशी यावेळी आपल्या मनोगतात म्हणाले. योजना यादव यांनी आभार मानले.

वाचकांना आपल्या लाडक्या महेश कोठारेंना प्रत्यक्ष भेटण्याची आणि 'डॅम इट आणि बरंच काही' या त्यांच्या पुस्तकावर त्यांची सही मिळवण्याची संधीही यावेळी मिळाली.

◆

पु
र
स्का
र

## 'नभांतमणी'ला मराठी वाङ्मय पुरस्कार

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, विलेपार्ले शाखेच्या वतीने दिले जाणारे सन २०२२-२३ साठीचे मराठी वाङ्मय पुरस्कार नुकतेच विलेपार्लेच्या शाखेमध्ये २ मार्च रोजी प्रदान करण्यात आले. कादंबरी वाङ्मय प्रकारातील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'नभांतमणी' या प्रा. शशिकांत कुगांवकर लिखित कादंबरीला मिळाला. प्रा. शशिकांत कुगांवकर यांचे मेहता पब्लिशिंग हाऊसच्या वतीने हार्दिक अभिनंदन!

## प्रा. चंद्रकुमार नलगे यांना 'विंदा करंदीकर जीवन गौरव'पुरस्कार

मराठी भाषा विभागातर्फे दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांचं वितरण मराठी भाषा दिनी करण्यात आलं.


कथा, कादंबरी, एकांकिका, चित्रपट लेखन इ. वाङ्मय प्रकारांत लेखन करणारे प्रा. चंद्रकुमार नलगे यांना सन २०२२चा 'विंदा करंदीकर जीवन गौरव'पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ. विठ्ठल वाघ यांना 'डॉ. अशोक रा. केळकर मराठी अभ्यासक पुरस्कार', तर डॉ. द. ता. भोसले यांना 'कविवर्य मंगेश पाडगावकर मराठी भाषा संवर्धक पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, या संस्थेला सन २०२२ चा संस्थेसाठी दिला जाणारा 'डॉ. अशोक केळकर मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार', तर 'कविवर्य मंगेश पाडगावकर मराठी भाषा संवर्धक पुरस्कार' कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी यांना देण्यात आला. हा पुरस्कार वितरण समारंभ मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात पार पडला.



**पुस्तकाच्या पानांतून**




# द लॉस्ट सिटी ऑफ Z

**डेव्हिड ग्रान**

अनुवाद

**मंदार गोडबोले**

*ॲमेझॉनमधील हरवलेलं शहर...त्या शहराच्या शोधात निघालेला फॉसेट...फॉसेटच्या या मोहिमेचा विविधांगाने घेतलेला रहस्यमय वेध.*

## नकाशावरचे काळे ठिपके

**‘पो**होचलो, ती पाहा ‘रॉयल जिओग्राफिकल सोसायटी’ असे म्हणून टॅक्सी ड्रायव्हरने मला संस्थेच्या दारासमोर सोडले. तो २००५चा फेब्रुवारी महिना होता. लंडनमध्ये ‘हाइड पार्क’च्या समोर ही सोसायटी होती. सोसायटीची इमारत एका अवाढव्य राजवाड्यासारखी दिसत होती. खरे तर आधी तो राजवाडाच होता. १९१२ मध्ये सोसायटीला मोठ्या जागेची गरज भासू लागल्यावर, त्यांनी तो राजवाडा विकत घेतला होता. इमारत तीनमजली उंच होती आणि त्याच्या



भिंती लाल रंगाच्या विटांच्या होत्या. इमारतीला सरकवून उघडता येणाऱ्या खिडक्या होत्या. डच पद्धतीचे मोठे खांब होते आणि वर तांबूस रंगाचे मोठे छप्पर होते. छतावर बऱ्याच ठिकाणी धुराडी वर आलेली होती. लहान मुलांच्या गोष्टीतला ‘कॅसल’ जसा असतो, तशीच ही इमारत दिसत होती. बाहेरच्या भिंतीवर लिव्हिंगस्टोनचे आणि अर्नेस्ट शॅकलटनचे हुबेहूब आकाराचे पुतळे लावलेले होते. लिव्हिंगस्टोनचा पुतळा, त्याची चालायची काठी आणि ट्रेडमार्क टोपी घालून होता. अर्नेस्ट शॅकलटन हा अंटार्क्टिकाला जाणारा शोधक प्रवासी होता. त्याचा पुतळा मानेवर स्कार्फ आणि बर्फात चालायचे बूट घातलेला होता. दरवाजापाशी मी गार्डला लायब्ररीचा रस्ता विचारला. तिथल्या लायब्ररीमध्ये फॉसेटच्या शोधक आयुष्याबद्दल आणि त्याच्या शेवटच्या सफरीबद्दल मोलाची माहिती मिळेल, अशी मला आशा होती.

जॉन हेमिंग हे ‘रॉयल जिओग्राफिकल सोसायटी’चे माजी संचालक होते. त्यांचा ब्राझीलमधील इंडियन जमातींचा गाढा अभ्यास होता. मी त्यांना जेव्हा प्रथम फोन करून फॉसेटबद्दल विचारले, तेव्हा त्यांनी मला प्रतिप्रश्न केला, ‘तू त्या फॉसेटमागे वेड्या झालेल्यांपैकी नाहीस ना रे बाबा?’ फॉसेटचे पुढे काय झाले, त्याचा ध्यास लागलेल्या लोकांचा सोसायटीने धसका घेतला होता. आता बरीच वर्षे झाली असली आणि तो सापडण्याची शक्यता नसली, तरी अजूनही त्याच्याविषयीच्या गूढ रहस्याचा शोध घेणारे लोक होते. कित्येक दशके अशा लोकांनी त्याच्याबद्दल माहिती पुरवावी म्हणून सोसायटीला सतावले होते. त्यातल्या बहुतेक लोकांचा झाल्या गोष्टीबद्दल काहीतरी विलक्षण सिद्धान्त असायचा. मग काही दिवसांनी ते फॉसेटच्या शोधात जंगलात शिरायचे. त्यांनी जंगलात शिरणे म्हणजे आत्महत्या करण्यासारखेच होते. त्या लोकांना ‘फॉसेट फ्रीक’ म्हणजे ‘फॉसेटसाठी वेड लागलेले,’ असे नाव पडले होते. १९९५ मध्ये एक माणूस फॉसेटच्या शोधात गेला, त्याने एक लेख लिहिला होता; जो प्रसिद्ध झाला नाही. त्यात त्याने असे लिहिले होते की, फॉसेटबद्दलचे त्याचे आकर्षण हा त्याला झालेला जणू एक रोगच आहे,आणि त्याने सोसायटीला मदतीची विनवणी केली होती. सोसायटीचा एक वैतागलेला कर्मचारी म्हणाला, ‘‘मला वाटते, त्या लोकांना वेड लागले आहे. त्या फॉसेटच्या रहस्यासाठी ते अगदी वेडे झाले आहेत.’’ फॉसेटच्या कागदपत्रांबद्दल विचारण्यासाठी मी तिथे जात होतो, ते मला अगदी वेडगळपणाचे वाटत होते; पण सोसायटीच्या

संग्रहात जी माहिती मिळेल ती माझ्यासाठी अमूल्य होती. सोसायटीचा संग्रह नुकताच आम जनतेसाठी खुला केला गेला होता. त्या संग्रहात चार्ल्स डार्विनचा सेक्स्टंट आणि लिव्हिंगस्टोनने काढलेल्या मूळ नकाशासारख्या अमूल्य गोष्टींचा समावेश होता.

मुख्य दरवाजापाशी गार्डने मला एक ओळखपत्र बनवून दिले, ज्यामुळे मला आत प्रवेश करता आला. मी त्या राजवाड्यातल्या संगमरवरी कॉरिडॉरमधून पुढे गेलो. वाटेत मला जुनी धूम्रपानाची आणि नकाशाची खोली लागली. त्या ठिकाणी फॉसेट नक्कीच गेला असणार. नकाशाच्या खोलीला अक्रोडाच्या लाकडाच्या भिंती होत्या.अलीकडच्या काळात सोसायटीने काचेचे नवीन प्रेक्षांगण बांधले होते; पण तरीही संस्थेभोवतालचे ऐतिहासिक वातावरण काही कमी झाले नव्हते.

फॉसेटच्या काळात, सोसायटी त्या काळाचा सर्वांत अवघड प्रकल्प हाती घेत होती, तो म्हणजे जगाचा नकाशा बनवणे. कदाचित तितके मोठे, तितके अवघड असे दुसरे कोणतेही काम कोणत्या संस्थेने कधी हाती घेतले नसावे. ब्रुकलीनचा पूल किंवा पनामाचा कालवा बांधण्यापेक्षाही हे महत्त्वाचे होते. ग्रीक लोकांनी आधुनिक नकाशे बनवण्याचे शास्त्र विकसित केले त्या कामाला शेकडो वर्षं आणि कोट्यवधी डॉलर्स लागले होते. त्यामध्ये हजारो माणसे मृत्युमुखी पडली होती. एकदा हे काम पूर्ण झाल्यावर ते यश इतके मोठे होते की, त्या आधी हे जग कसे वाटायचे किंवा ते काम कसे पूर्ण झाले ते कुणाच्याच लक्षात राहिले नाही.

सोसायटीच्या कॉरिडॉरमध्ये एका भिंतीवर सतराव्या शतकातला, जगाचा प्रचंड आकाराचा नकाशा लावलेला होता. नकाशाच्या मार्जिनमध्ये, समुद्रातल्या अक्राळविक्राळ काल्पनिक राक्षसांची आणि ड्रॅगनची चित्रे लावलेली होती. कित्येक युगे भूगोलतज्ज्ञांना, जगाच्या बहुतेक भागांत नक्की काय आहे, ते ठाऊक नव्हते. संपूर्ण अज्ञात ठिकाणांची माणसाला कायमच भीती वाटत आली आहे. बरेच वेळा त्यातल्या अज्ञात ठिकाणी, कल्पित राज्य किंवा महाप्रचंड राक्षस आहेत, अशी कल्पना केली जाई. हे काल्पनिक राक्षस किंवा प्रांत कितीही भीतिदायक असले, तरी पूर्ण अज्ञात असणाऱ्या कशापेक्षा ते नक्कीच कमी भीतिदायक होते.

मध्यकाळापासून चौदाव्या-पंधराव्या शतकापर्यंत, नकाशात आशिया प्रांतात,

माणसांना फाडून खाणारे पक्षी आहेत, असे दाखवले जाई. जर्मनीमध्ये रात्री चमकणारा एक पक्षी आहे, भारतातील लोकांना अगदी पायाच्या सोळा बोटांपासून ते कुत्र्याचे डोके असलेले दाखवले जाई. आफ्रिकेतले तरस इतके भीतिदायक दाखवले जायचे की, त्यांची सावली बघूनच कुत्र्यांची दातखीळ बसायची. त्याशिवाय तिथे म्हणे 'कोकाट्राइस' नावाचे असे एक जनावर होते, जे केवळ उच्छ्वास सोडून कुणालाही मारू शकायचे. नकाशातली सगळ्यात भीतिदायक जागा 'गॉग' आणि 'मगॉग'चे राज्य ही होती. एझेकिएलच्या पुस्तकात अशी चेतावणी दिली होती की, त्यांची सेना उत्तरेकडून येऊन इस्राइलच्या जनतेचा नाश करेल. 'जमिनीवर ढगाचे आच्छादन करावे तसे ते तिथल्या जनतेला आच्छादून टाकतील.'

त्याच वेळी नकाशात काल्पनिक स्वर्गाच्या जागेबद्दलही खूप आकर्षण होते. जेथे तारुण्याचे कारंजे आहे, अशा जागा नकाशात दाखवल्या जात. सोळाव्या शतकात 'पोन्स डे लियोन' नावाचा माणूस त्या तारुण्याच्या कारंज्याच्या शोधात अमेरिकेतील फ्लोरिडा प्रांतात भटकला. सातव्या शतकातला ज्ञानकोशकार एझिडोर ऑफ सेव्हिल याने तारुण्याच्या कारंज्याबद्दल असे लिहिले आहे की, 'त्या कारंज्यापाशी कल्पनेतले प्रत्येक फळझाड फुललेले आहे व त्याच्या जवळच कल्पवृक्षही आहे.'

बाराव्या शतकामध्ये या असल्या कविकल्पनांना आणखी उत्तेजन मिळाले, तेव्हा 'बायझाशियम'च्या सम्राटाला एक पत्र मिळाले. ते पत्र म्हणे प्रेस्टर जॉन नावाच्या राजाने लिहिलेले होते. त्या पत्रामध्ये असे लिहिले होते की, 'मी प्रेस्टर जॉन, स्वर्गाचा इंद्र आहे. माझी संपत्ती, प्रभाव आणि सामर्थ्य सर्वांत श्रेष्ठ आहे. बहात्तर देशांचे राजे माझे आधिपत्य मानतात. आमच्या राज्यात मधाच्या नद्या आहेत आणि सगळीकडे दुधाची रेलचेल आहे. आमच्या राज्यातल्या एका परिसरात विषाचा कोणताही परिणाम होत नाही. तिथे बेडकांचा डराव-डराव आवाज ऐकू येत नाही, तिथे विंचू नाहीत, गवतात सरपटणारे सापदेखील नाहीत. तिथे सरपटणारा कोणताही प्राणी राहू शकत नाही किंवा आपली शक्ती वापरू शकत नाही.' हे पत्र जरी रूपकात्मक असले तरी ते पत्र हाच स्वर्गाचा पुरावा असे मानले गेले. पूर्वेकडच्या अज्ञात परिसरात तो स्वर्ग आहे, असे नकाशा बनवणाऱ्यांनी ठरवले. ११७७ मध्ये तृतीय पोप ॲलेक्झांडर यांनी आपला वैयक्तिक डॉक्टर त्या दिशेला पाठवला. त्याला सांगितले होते की,

'ख्रिस्ताच्या प्रिय पुत्राला, सुप्रसिद्ध आणि सर्वश्रेष्ठ इंडियन सम्राटाला, पवित्र धर्मोपदेशकाला अभिवादन कर आणि त्या प्रेषिताचे आशीर्वाद घेऊन ये.' तो वैद्य कधी परत आला नाही; तरीही चर्च आणि अनेक देशांतील राज्यसभा, ते नंदनवन शोधायला माणसे पाठवत राहिल्या. १४५९ मध्ये व्हेनिसमधील कार्टोग्राफर फ्रा मॉरो याने जगाचा, त्या काळाच्या मानाने अतिशय परिपूर्ण असा नकाशा बनवला होता. शेवटी एकदाचे प्रेस्टर जॉनचे साम्राज्य आशियामधून बाहेर पडले होते. त्याऐवजी मॉरोने लिहिले होते, 'प्रेस्टर जॉनचा वास इथियोपिया इथे आहे.'

अगदी अलीकडे म्हणजे, १७४० पर्यंत जगातील केवळ एकशेवीस ठिकाणे नकाशावर अचूकपणे दाखवली गेली होती. अचूकपणे चालणारी आणि तरीही सहज बरोबर घेऊन जाता येण्यासारखी घड्याळे अस्तित्वात आलेली नसल्यामुळे, शोधक लोकांना, गेलेल्या ठिकाणाचे अक्षांश योग्य रीतीने मोजता येत नव्हते. अक्षांश मोजण्यासाठी अचूक घड्याळ बरोबर असणे अतिशय आवश्यक आहे. त्या काळी जहाजे दगडात आणि उथळ समुद्रात नांगर टाकत होती. त्यांच्या कप्तानांना अशी खात्री असे की, ते शेकडो मैल समुद्रात आले आहेत. हजारो माणसे मृत्युमुखी पडत असत, कोट्यवधी डॉलर्स मूल्याचे सामान वाया जात असे. १७१४ मध्ये ब्रिटिश संसदेने असे जाहीर केले की, 'रेखांशांची अचूक मोजणी करणे, हे ग्रेट ब्रिटनच्या नौदलाच्या आणि व्यापारी नौकांच्या सुरक्षिततेसाठी तसेच व्यापार सुधारण्यासाठी अत्यावश्यक आहे.' अचूक मोजणी करणारे, वापरायला सोपे असणारे यंत्र बनवणाऱ्याला संसदेने वीस हजार पौंडांचे बक्षीस जाहीर केले. आजच्या चलनात त्याची किंमत सुमारे एक कोटी वीस लाख डॉलर एवढी होते. त्या काळच्या सर्वश्रेष्ठ शास्त्रज्ञांनी, ती समस्या सोडवायचा प्रयत्न केला. बहुतेक लोकांनी, चंद्राची आणि रात्रीच्या ताऱ्यांची स्थिती वापरून वेळ निश्चित करण्याचा प्रयत्न केला; पण १७७३ मध्ये जॉन हॅरिसन याला त्या स्पर्धेचा विजेता म्हणून घोषित केले गेले. त्याने हिरे आणि माणिक वापरून तीन पौंड वजनाचा क्रोनोमीटर बनवला.


जरी हॅरिसनला यश मिळाले असले, तरी त्याच्या यंत्रामुळे नकाशे बनवणाऱ्यांना भेडसावणाऱ्या प्रमुख समस्येवर उपाय सापडला नव्हता. त्यांना भेडसावणारा मुख्य प्रश्न अंतराचा होता. युरोपिअन लोक अजूनही जगाच्या टोकापर्यंत, म्हणजे उत्तर आणि दक्षिण ध्रुवापर्यंत पोहोचले नव्हते. त्याशिवाय त्यांनी

आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण अमेरिकेच्या अंतर्भागात अजून शोध घेतलेला नव्हता. नकाशा बनवणारे लोक, त्यांच्या नकाशातील या भागावर अजूनही 'अज्ञात' अशी खूण करत होते.

अखेर एकोणिसाव्या शतकात सगळीकडे ब्रिटिश साम्राज्य पसरत चालले होते. अनेक ब्रिटिश शास्त्रज्ञांना, नौदलप्रमुखांना आणि व्यापाऱ्यांना दिवसेंदिवस असे जाणवू लागले होते की, नुसत्या कल्पनेवर आधारित न राहता, निरीक्षणावर आधारित नकाशा बनवण्याऱ्या संस्थेची गरज आहे. ही संस्था नुसतीच पृथ्वीच्या आकाराची खात्री करून घेऊन थांबणार नव्हती, तर आतील सर्व ठिकाणांचा अचूक नकाशा बनवणार होती; त्यामुळे १८३० मध्ये लंडनच्या 'रॉयल जिओग्राफिकल सोसायटी'ची स्थापना केली गेली. त्या काळी संस्थेच्या घटनेत 'नवीन गोष्टींची आणि जागांची माहिती गोळा करणे, तपासणे आणि छापणे' आणि त्याशिवाय, 'भूगोलावरील सर्वोत्कृष्ट पुस्तकांचा संग्रह करणे, नकाशांचा संग्रह करणे' अशा गोष्टींचा उल्लेख होता. त्याशिवाय संस्था सर्व्हेक्षणासाठी लागणारी सर्वांत प्रगत उपकरणे जमा करणार होती आणि जगाच्या पाठीवर कुठेही जाणाऱ्या शोधक मोहिमांना मदत करणार होती. 'जगाच्या पाठीवर अशी एक इंचभरदेखील जागा असणार नाही, जिथे इथले शोधक जाण्याचा प्रयत्न करणार नाहीत.' संस्थेच्या एका अध्यक्षाने आपल्या नंतरच्या भाषणात सांगितले होते, 'ते आमचे काम आहे. त्यासाठीच या संस्थेचा जन्म झाला आहे.' ब्रिटिश साम्राज्य सर्वत्र पसरावे म्हणून संस्था हे काम करत होती, हे खरे आहे. तरी देखील पूर्वीच्या काळी कोलंबससारखे शोधक जसे स्वर्गाच्या, देवाच्या, संपत्तीच्या किंवा कीर्तीच्या शोधात बाहेर पाठवले जात, त्यापेक्षा संस्थेचा दृष्टिकोन खूपच वेगळा होता. 'रॉयल जिओग्राफिकल सोसायटी'ने पाठवलेल्या मोहिमा केवळ शोधासाठी शोध घेणार होत्या. त्यांचा शोध नव्या 'देवा'च्या साठी होता – म्हणजे शास्त्राच्या प्रगतीसाठी!

◆

पु
स्त
का
च्या
पा
नां
तू
न




# द वुमन इन द विंडो

**ए. जे. फिन**

अनुवाद

**सावनी केळकर**

*मी काय पाहिलंय, ते मला माहिती आहे. ते कुणी केलंय, हेही मला माहिती आहे.आता मीच तर शिकार होणार नाही ना? एका स्त्रीची स्वत्व जपण्याची धडपड.*

## रविवार, २४ ऑक्टोबर

### (एक)

तिचा नवरा अगदी घराजवळ आलाय. आता तो कोणत्याही क्षणी तिला नक्कीच रंगेहाथ पकडेल.



शहरातल्या त्या २१२ नंबरच्या, मातकट लाल रंगाच्या घरात 'मॉट्स' हे नवपरिणीत जोडपं राहायला आलं, तेव्हापासून ते अगदी आता त्यांचा घटस्फोट होईपर्यंत, त्यांच्या घराला पडदे किंवा व्हॅनिशिंग ब्लाइंडदेखील बसवलेले नव्हते. तसं मी त्या दोघांपैकी एकालाही प्रत्यक्ष भेटले नव्हते;

पण अधूनमधून ऑनलाइन जाऊन त्याची 'लिंक्डइन प्रोफाइल' आणि तिचे 'फेसबुक अकाउंट' पाहत होते; त्यामुळे मला ते दोघेही चांगलेच परिचयाचे झाले होते. सर्वांत मोठ्या सुप्रसिद्ध ऑनलाइन रिटेल शॉप 'मॅसी'वर अजूनही त्यांच्या लग्नाचे रजिस्ट्रेशन उपलब्ध होते, आणि गंमत म्हणजे आताही मी त्यांच्यासाठी त्या साइटवरून घरगुती सामान खरेदी करू शकत होते.

तर मी असं म्हणत होते की, खिडक्यांना अजूनही पडदे बसवले नव्हते; त्यामुळे थेट पलीकडच्या रस्त्यावरूनदेखील ते मातकट घर अगदी सहज दृष्टिपथात येत असे आणि मलाही त्यांच्या घरामध्ये काय चाललंय, हे सहज दिसू शकत असे. त्या दिवशी तर त्या घराच्या मालकिणीने आपल्या 'गेस्ट बेडरूम'मध्ये आपल्या कॉन्ट्रॅक्टरला अगदी सहज आत येऊ दिलं होतं, हे मी माझ्या घरातून पाहिलं होतं. त्या घराचं गुपित नक्की काय होतं? तिथे प्रेम फुलायच्या आधीच संपायची परंपरा होती की काय?

ती सुंदर आहे. तिचं ते भव्य कपाळ, हिरव्या रंगाचे वेध घेणारे डोळे आणि छोट्या छोट्या काळ्या तिळांनी आखलेली सुंदर नक्षीदार पाठ! छानच दिसायची ती तिच्या नवऱ्यापेक्षा! डॉक्टर जॉन मिलर हा तिचा नवरा... आणि त्याच्यापेक्षाही ती दिसायला सुंदरच होती. ऑनलाइन सापडणाऱ्या चार लाख ३६ हजार जॉन मिलरपैकी हा 'जॉन मिलर' मनोचिकित्सक होता आणि तो वैवाहिक समुपदेशनदेखील करायचा. मॅनहॅटनमधल्या 'ग्रेमर्सी पार्क'जवळ या महाभागाचं कामाचं ठिकाण होतं आणि हो, तो विम्याच्या केसेस मात्र घेत नसे. ऑनलाइनच्या सेल डीडनुसार आताचं घर त्याने ३.६ मिलियन डॉलर्सना खरेदी केलं होतं, म्हणजे त्याची आवक नक्कीच उत्तम असणार!

तसं जरी मी दोघांनाही ओळखत असले तरी तिला मात्र फार कमी ओळखत होते. ती फारशी गृहिणीसारखी वाटली नाही मला आणि तसंही ही दोघं मिलर्स मंडळी आठ आठवड्यांपूर्वीच तर इथे राहायला आली होती आणि बघा, त्यांनी अजून खिडक्यांना पडदेदेखील लावलेले नव्हते. ती आपल्या सुडौल पायांवर लुलुलेमनचे कपडे चढवून आणि योगा मॅट काखोटीला मारून घरातल्या पायऱ्यांवरून चढ-उतार करत आठवड्यातून तीन दिवस योगा करायची. बहुधा सोमवारी आणि शुक्रवारी ती कुठेतरी स्वयंसेवक म्हणून कामाला जात असावी, कारण सोमवार आणि शुक्रवार हे दोन दिवस मी जेव्हा सकाळी ११ वाजता उठायची, तेव्हा तिला घराबाहेर जाताना पाहत असे आणि

मी जेव्हा माझा रात्रीचा सिनेमा पाहायची तयारी करत असे, त्या वेळेस म्हणजे साधारण पाच-साडेपाचच्या दरम्यान ती परत यायची. (आज मी 'द मॅन हू नो टू मच' हा चित्रपट कितव्यांदा पाहणार आहे, ते मलाही आठवत नाहीये. मी खरंच खूप चित्रपट पाहिलेत.)

मला दुपारी ड्रिंक घ्यायला आवडतं ना, तसंच तिलाही ते आवडतं हे मी अनेकदा पाहिलंय. माझ्यासारखंच तिलादेखील सकाळी ड्रिंक घ्यायला आवडत असेल का?

पण तिचं नक्की वय काय असावं, ते समजून येत नाही. अर्थात ती डॉक्टर मिलरपेक्षा आणि माझ्याहीपेक्षा अगदी तरुणच दिसते म्हणा आणि ती चपळदेखील आहे. ऑनलाइन सर्च करूनही मला तिचं नाव काही समजू शकलेलं नाहीये. मी त्याबद्दल केवळ तर्कच करू शकते. ती १९४६ मध्ये आलेल्या 'गिल्डा' चित्रपटात मुख्य भूमिका असलेल्या रिटा हेवर्थसारखी दिसते. मला त्यातलं 'आय ॲम नॉट इन द लीस्ट इंटरेस्टेड' हे वाक्य खूपच आवडतं.

मला स्वतःला खूप स्वारस्य आहे तिच्यात! तिच्यात म्हणजे तिच्या दिसण्यात नव्हे; तशी ती दिसते अनेकदा सौंदर्यवती - फिकट निळ्या रंगाच्या ब्रामध्ये लपवलेल्या तिच्या उन्नत वक्षस्थळांना पुढे आणत, बाणेदारपणे पाठीचा कणा उभारून, डौलाने पंख पसरलेल्या पक्ष्यासारखे खांदे रुंद करून चालताना तिला माझ्या कॅमेऱ्याच्या लेन्समध्ये मी टिपलंय अनेकदा; पण अशा सगळ्या वेळी मी तिच्याकडे पाहणं टाळते. त्यात मला काही स्वारस्य नाहीये. मला तिचं जीवन भरभरून जगणं आवडतं. मी तिला माझ्यापेक्षा वेगळ्या पद्धतीने आणि उत्तम रीतीने जगताना पाहते, तेव्हा मला तिच्यात जास्त रस वाटतो.

आताच काही वेळापूर्वी तिचा नवरा कोपऱ्यावरून बाहेर जाण्यासाठी वळला असेल आणि तिने लगेच त्याच्यामागे दार लावत असताना त्या कॉन्ट्रॅक्टरला आपल्या घरात घेतलंय.दर रविवारी डॉक्टर मिलर अगदी हमखास पावणेचार वाजता घरी परत येत असतात. हे नेहमीचं ठरलेलं आहे.

पण आज अघटितच घडलं. आत्ता हे डॉक्टर हातातलं लग्नाचंच ब्रेसलेट चमकवत, अगदी धाप लागेल इतक्या जोरात चालत, हातातल्या ब्रीफकेसला हेलकावे देत, धावतपळत फूटपाथवरून परत घराकडे येताना दिसत होते. मी

लगेच त्यांच्या पायाकडे माझा कॅमेरा झूम केला. प्रत्येक पावलागणिक त्यांचे ऑक्सब्लड ऑक्सफर्ड शूज, त्यावर पडणाऱ्या शरदातल्या उन्हामुळे आणि पॉलिशमुळे अगदी चकाकत होते.

आता मी माझा कॅमेरा त्यांच्या चेहऱ्यावर झूम केला. मला माझ्या निकॉन डी ५५०० चा रास्त अभिमान वाटला, पुन्हा एकदा. किती जवळून दिसत असल्यासारखं सारं काही दाखवते ही ऑप्टेका लेन्स! त्यांचे हवेच्या झोताबरोबर वर-खाली होणारे चुकार केस,नाजूकसा परंतु हलक्या प्रतीचा चश्मा, गालांवर उगवलेली खुरटी दाढी हे सगळं माझ्या कॅमेऱ्याने खूप छान टिपलं. हा माणूस आपल्या चेहऱ्यापेक्षा बुटांची काळजी अधिक घेतो असं वाटतं.

पुन्हा एकदा २१२ क्रमांकाच्या घराकडे वळू या! तिथे रिटा आणि कॉन्ट्रॅक्टरमध्ये लगट सुरू झालीय आणि आता ती अगदी परमोच्च बिंदू गाठणार असे संकेत दिसताहेत. खरंतर मी तिला मदत करावी म्हणून तिच्या घरी फोन करून, सूचना देऊ शकले असते; पण मी तसलं काही केलं नाही. दुसऱ्यांच्या खासगी आयुष्यात कॅमेऱ्याद्वारे डोकवायचे म्हणजे नेचर फोटोग्राफी करण्यासारखे आहे. पाहायचे पण हस्तक्षेप करायचा नाही त्या आयुष्यात!

डॉक्टर मिलर आता त्यांच्या घराच्या दरवाजापासून अगदी अर्ध्या मिनिटावर आलेत.आतमध्ये त्यांच्या बायकोने कॉन्ट्रॅक्टरबरोबर प्रणय सुरू केलाय. त्याच्या मानेवर तिच्या ओठांची मोहोर उमटतेय... तिची वस्त्रं तिच्या शरीरावरून बाजूला झाली आहेत.

आता फक्त चार पावलं. पाच, सहा, सात. जास्तीत जास्त वीस सेकंद.

तिने हसतहसत त्याचा टाय आपल्या दातांनी पकडलाय आणि तिचे हात त्याच्या शर्टाबरोबर खेळू लागलेत. त्यानेही तिच्या कानाचा हळुवारपणे चावा घेतलाय.

इकडे तिचा नवरा अगदी पंधरा सेकंदांत दाराजवळ येऊन ठेपणार आहे. तो घराजवळच फूटपाथवर आला देखील.

मला तर इथे त्याचा टाय तिने कॉलरमधून हिसकावून काढून, तो खोलीत कुठेतरी फेकून दिल्याचा आवाज देखील आल्यासारखं वाटलं.

अगदी दहाच सेकंद राहिली आहेत. मी अगदीच घाईने कॅमेरा पुन्हा एकदा झूम केला. दाराबाहेर आता त्याने आपल्या खिशात हात घालून किल्ल्यांचा जुडगा बाहेर काढला. फक्त सात सेकंद!

इकडे तिने आपल्या पोनीटेलचे रबर काढून टाकलेय... आता तिच्या मानेवर मऊ मुलायम केस रुळायला लागलेत.

तीन सेकंद! आता तो पायऱ्या चढतोय.

तिने आपल्या हातांनी त्याला वेढून घेत त्याचं प्रदीर्घ चुंबन घेतलंय.

इकडे याने किल्ली की-होलमध्ये घातली आणि ती फिरवली.

मी आता तिच्यावर कॅमेरा रोखला. तिने किल्लीचा आवाज ऐकलाय. तिचे डोळे मोठ्ठे झालेत.

मी तशात तिचा फोटो काढला.

इकडे याची ब्रीफकेस अचानक चुकून उघडली गेली.

तिच्यामधून कागदांचे ताव उडतउडत बाहेर आले आणि जमिनीवर इतस्ततः विखुरले. आता पुन्हा मी कॅमेरा डॉक्टर मिलरवर रोखला. त्यांच्या तोंडाचा चंबू झाला होता. मुख्य दरवाजासमोरच्या पायरीवर त्यांनी आपली ब्रीफकेस ठेवली. काही कागद उडू नयेत म्हणून आपल्या चमकदार बुटाखाली दाबले. काही दोन्ही हातांमध्ये कसेबसे पकडले. एक चुकार कागद त्यांच्याही नकळत झाडांच्या फांद्यांमध्ये अडकून राहिला.

इकडे रिटाने स्वतःला सावरत कपडे घातलेत. केस ठीकठाक केलेत. कॉन्ट्रॅक्टरदेखील घाईने उठला, खोलीत कुठेतरी पडलेला टाय त्यानं पटकन आपल्या खिशात कोंबला.

मी सुटकेचा निःश्वास सोडला. मला स्वतःलाही इतका वेळ समजलंच नव्हतं की, मी माझा श्वास रोखून धरलाय.

घराचं दार तिने उघडलं. रिटाने पायऱ्या उतरत खाली येताना आपल्या नवऱ्याला आवाज दिला. त्याने तिच्याकडे वळून पाहिलं आणि बहुधा तो हसला असावा. मला ते दिसलं नाही. तिने खाली उतरतानाच खाली पडलेले कागद गोळा केले.

इकडे कॉन्ट्रॅक्टर दरवाजाबाहेर आला. त्याने एक हात खिशात घातलाय. दुसरा हात हाय म्हणत स्वतः समोर हालवला. डॉक्टर मिलर यांनी देखील उत्तरादाखल त्याला हाय केलेय. आपली ब्रीफकेस उचलत ते पायऱ्या चढून वर गेलेत आणि दोघांनी शेकहॅन्ड केलाय. दोघेही आत गेलेत आणि पाठोपाठ रिटादेखील!

वेल! बेटर लक नेक्स्ट टाइम!

## सोमवार, २५ ऑक्टोबर

## (दोन)

त्या अंधारलेल्या वातावरणात काही वेळापूर्वी एखादी शववाहिका सावकाश येऊन दाखल व्हावी, तशी एक चारचाकी येऊन थांबली. त्या कारच्या पाठीमागचे दिवेदेखील अगदी अंधूक प्रकाश देत होते. मी माझ्या लेकीला सांगितलं, ''बहुधा नवीन शेजारी आलेले दिसताहेत.''

''कोणत्या घरात आलेत गं?''

''बागेच्या पलीकडच्या दोनशे सातमध्ये.'' गाडीतून ते खाली उतरले, अंधारात त्यांच्या आकृत्या अगदी भुतासारख्या भासत होत्या.

आणि तिच्या खाण्याचा आवाज आला.

''काय खातेस?'' मी विचारलं; पण मला माहीत होतं की, आज तिचा चायनीज खाण्याचा दिवस होता. नक्कीच ती 'लो मेन'नूडल्स खात असणार.

''लो मेन.''

''मम्मीबरोबर बोलत असताना काही खाऊ नये बाळा!''

तिने पुन्हा एकदा तोंडाने नुडल्स ओढल्या, त्याचा आवाज आला मला.

''मॉ...म'' हे आमच्या दोघींमधलं नेहमीचं शीतयुद्ध होतं. ती नेहमीच असं करते. मला आवडत नाही म्हणून मुद्दाम 'मॉ...म' असं म्हणत राहते. मी रागवेन असं वाटलं म्हणून एडमधला बाप लगेच जागा होत म्हणाला, ''जाऊ दे गं... तू पण काय ते धरून बसतेस?''

ऑलिव्हियाने विषय बदलत सुचवलं, ''अगं, त्यांच्याशी ओळख का करून घेत नाहीस तू?''

''बेबी, मलाही ते नक्कीच आवडेल गं.'' मी आता हातात वाईनचा ग्लास घेऊन वर दुसऱ्या मजल्यावर चढून गेले. तिथून सगळं नीट दिसू शकत होतं. एकेक घोट घेत मी वर पोहोचले होते.

''मनू पाहिलंस का तू? सगळ्यांच्या शेतात मस्त भोपळे आलेत आणि त्या ग्रे च्या घराबाहेर तर चार आलेले दिसताहेत. तुझ्यासाठीदेखील एखादा भोपळा तोडून आणावा असं वाटतंय मनुड्या मला. डॅडींना सांग हं, तुझ्यासाठी

एखादा भोपळा आणायला.'' वाईनचा मोठ्ठा घोट घेत मी म्हणाले, ''नाहीतर असं कर ना, त्यांना दोन आणायला सांग; एक तुझ्यासाठी आणि एक माझ्यासाठी.''

''हं... सांगेन.''

माझी नजर पावडर रूममध्ये असलेल्या अंधाऱ्या आरशातल्या माझ्या प्रतिबिंबाकडे गेली, माऊ, तू खूश आहेस ना गं?

''हो...''

''मला सांग,तुला एकटं तर वाटत नाही ना?'' तिला न्यू यॉर्कमध्ये कुणीच मित्र-मैत्रिणी नव्हते. तशीही ती खूपच लहान आहे आणि बुजरीदेखील.

''नाही गं...''

मी जिन्याच्या वरच्या बाजूने जिथून अंधूक प्रकाश येत होता, तिथे पाहिलं. सकाळच्या वेळी वरच्या भिंतीतल्या खिडकीमधून सूर्याचा प्रकाश आतमध्ये यायचा आणि रात्रीच्या वेळी त्या विशाल आकाशाचा एक तुकडा पायऱ्यांवरून दिसायचा तसेच त्यातून येणारा अंधूक प्रकाश पायऱ्या दाखवायला मदत करायचा.

''तुला 'पंच' बोक्याची आठवण तरी होते का गं?''

''अहं...''

ती तर कधी घरातल्या बोक्याबरोबर खेळायचीदेखील नाही. एकदा ख्रिसमसच्या दिवशी सकाळीच त्या बोक्याने तिच्या मनगटावर आपल्या पंजाने इतक्या पटकन फटकारलं की, तिच्या इवल्याशा गोऱ्या हातावर कितीतरी ओरखडे उठले आणि त्यातून लगेच रक्ताचे थेंब बाहेर येऊ लागले. 'एड'ने चिडून त्या बोक्याला खिडकीतून बाहेर फेकून दिलं होतं. अरे, आत्ता कुठे गेलाय हा बोका? जरासा शोध घेतल्यावर माझ्या लक्षात आलं की, तो माझ्या लायब्ररीमधल्या सोफ्यावर अंगाचं वेटोळं करून बसलाय आणि माझ्याकडेच पाहतोय.

''माऊ, जरा डॅडीला फोन देतेस?'' मी जिना चढायला सुरुवात केली. हा जिना इतका खडबडीत कसा झाला? त्याचा करकर असा आवाज येतोय. आम्ही किती विचार केला होता यावर? इतक्या लवकर हा गंजला?

''काय गोगलगाय मॅडम? नवीन शेजारी हं... मज्जा आहे बुवा!'' एडने अगदी नेहमीप्रमाणे मला हाक मारली.

''हो...''

''अगं पण, काही दिवसांपूर्वीच तर त्या बाजूला नवे शेजारी आलेत ना राहायला?''

''अरे, त्याला झाले की दोन महिने. ते २१२ मध्ये आलेत राहायला. मिलर आडनाव आहे त्यांचं.'' मी वळून जिना उतरायला सुरुवात केली.

''मग, आता हे नवे शेजारी कोणत्या घरात आलेत राहायला?''

''२०७ मध्ये रे. बागेच्या पलीकडे.''

''किती शेजारी बदलून-बदलून येतात नाही?''

मी पुन्हा खाली दोन जिन्यामधल्या सपाट जागेत पोहोचले. तिथून एक वळसा घालून खिडकीजवळ पोहोचले. ''अरे, त्यांनी फार सामान आणलेलं दिसत नाहीये. एकच कार घेऊन आलेत.''

''अगं, कदाचित सामानाचा ट्रक नंतर येईल...''

''हो... बहुतेक.''

मी एकेक घोट घेत असताना सगळीकडे नुसतीच शांतता होती.

आता मी लिव्हिंग रूममध्ये आले. फायरप्लेसजवळ उभी राहिले, तेव्हा कोपऱ्यातल्या भिंतीवर माझीच सावली पडली.

''ए, ऐक ना...'' एडने पुन्हा सुरुवात केली.

''अरे, त्यांना एक मुलगा आहे.''

''काय...''

''अरे, त्यांना एक मुलगादेखील आहे.'' एव्हाना माझं डोकं मी फायरप्लेस लगतच्या थंड पडलेल्या खिडकीच्या काचेवर टेकवलं होतं. न्यू यॉर्कमधल्या 'हर्लेम' जिल्ह्यातल्या या रस्त्यांवरचे सोडियमचे दिवे अजून उजळायचे होते. चंद्राच्या अंधूकशा प्रकाशाने हळुवारपणे तो रस्ता उजळून निघत होता; तरीही त्या अंधूक प्रकाशात मी त्या तिघांच्या सावल्यांवरून नक्कीच अंदाज बांधू शकत होते. त्यांच्यात एक पुरुष, एक स्त्री आणि एक उंच मुलगा आहे आणि ते सगळे मुख्य दरवाजातून आपले सामान आत नेत होते.

''अरे, तो तर टीनएजर दिसतोय.''

''अगं, किती हा उतावळेपणा? लहान आहेस का तू आता?''

पण मी स्वतःला थांबवू शकले नाही, ''तू आत्ता इथे हवा होतास रे एड.''

माझा आवाज जड झाला. माझ्या कापऱ्या आवाजाने एडदेखील गप्पच बसला. थोडा वेळ कुणी काहीच बोललं नाही.

आणि मग तो हलकेच म्हणाला, ''तुला अजून थोडा वेळ मिळायला हवा.''

यावर माझ्याकडे उत्तर देण्यासारखं काही नव्हतं... मी शांत राहिले...

तो म्हणाला, ''डॉक्टर म्हणाले की, तुमचा जास्त सहवास नकोय...''

''असं म्हणणारी मीच ती डॉक्टर आहे.''

''तू एकटीच नाहीस. त्यांच्यातली एक...''

माझ्या मागे फायरप्लेसमध्ये एक ठिणगी वर उसळली. छोटासा आवाज करत ती लगेच खालच्या राखेत विरूनही गेली.

''तू त्यांना आज तुझ्याकडे का बोलावत नाहीस?''

माझा ग्लास रिकामा करताना मी म्हणाले, ''मला वाटलं, आजच्या दिवसासाठी इतकं पुरे.''

''ॲना.''

''एड.''

मला त्याचा श्वासोच्छ्वासदेखील अगदी जवळच ऐकू येत होता, ''आत्ता खरंच आम्ही तिथे हवे होतो गं, मला खूप वाईट वाटतंय.''

''मलाही...'' माझं हृदय आक्रंदू लागेल असं वाटलं मला या क्षणी.

माझ्या बोक्याने, पंचने मला खालच्या खोलीत येण्यास भाग पाडलं. मी त्याला उचलून हातात घेतलं आणि स्वयंपाकघराच्या दिशेने चालू लागले. फोन जागेवर ठेवून दिला. झोपण्यापूर्वी पुन्हा एक ग्लास वाईन घ्यायलाच हवी होती मला.

बाटली हातात घेत मी पुन्हा एकदा खिडकीतून डोकावले, हातातला ग्लास उंचावत मी त्या तीन भुतांच्या फूटपाथवरच्या सावल्यांना अभिवादन केलं आणि वाईन घशाखाली रिचवली.

◆


## नवी संहिता... नवा आशय...

**TBC-32 Book No. 3**

# नथिंग व्हेंचर्ड

**जेफ्री आर्चर**

अनुवाद
**सविता दामले**




एका हरवलेल्या चित्राचा शोध घेता घेता अनेक रहस्यांची गुंफण अलगद सोडवणाऱ्या डिटेक्टिव्ह विल्यम वॉरिकची अनोखी शोधकथा...


**किंमत : ५८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**TBC-32 Book No. 4**

# थिस वॉज अ मॅन

**जेफ्री आर्चर**


अनुवाद
**लीना सोहोनी**




Master story teller जेफ्री आर्चर यांच्या 'द क्लिप्टन क्रॉनिकल्स' या मालिकेचा सातवा भाग

**किंमत : ९९०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

पुस्तकाच्या पानांतून




# रहस्य प्राचीन नटराजाचे

**राधिका नाथन**

अनुवाद
**डॉ. मीना शेटे-संभू**

पुरातत्त्व विभागाच्या लायब्ररीमध्ये महत्त्वाच्या पदावर असलेला अपंग टॉम, चौल साम्राज्यातील नटराजाची खूप मोठी मूर्ती एका लिलावात विकत घेण्याचं ठरवतो आणि सुरू होतं एक रहस्यमय नाट्य...

“**अ**रे चल! काहीतरीच काय बोलतोयस, तिथे मृतदेह वगैरे काही नाही!” जॉश विन्स्लो तक्रारीच्या सुरात गंभीरपणे म्हणाला.

टॉमनेही तसाच रेकल्यासारखा आवाज काढून त्याला प्रतिसाद दिला. टेलिफोन लाइनच्या दुसऱ्या टोकाकडून आलेला तो प्रतिसाद हेडसेटवर खूप मोठा आणि स्पष्ट वाटला. त्यातून आपोआपच उतावळेपणा, आतुरता आणि तुच्छता व्यक्त होत होती.



लंडनमधील ‘हिथ्रो विमानतळा’ च्या बाहेरच्या भिंतीतून पुढे आलेल्या खिडकीतून जॉशने खिन्नपणे

आकाशाकडे पाहिलं. करड्या ढगांचं भेडसावणारं, भीतिदायक सावट पडलं होतं. त्याच्या मन:स्थितीशी ते अगदी मिळतंजुळतं होतं. जूनच्या पहिल्या आठवड्यातल्या मंगळवारची ती थंड, दमट सकाळ होती. तेव्हा नुकतेच कुठे अकरा वाजले होते. जॉश तिथे पहाटे चारपासून आला होता. त्याने तोपर्यंत फक्त पुसटसं लोणी लावलेला टोस्ट संत्र्याच्या रसाच्या ग्लासात बुडवून खाल्ला होता. त्याला भूक लागली होती. तो थकला होता आणि चिडलाही होता.

टर्मिनल ५ तसं कमी प्रमाणात व्यस्त आणि बऱ्यापैकी शांतपणे, सुरळीतपणे सुरू होतं. प्रवासी एक तर आळसावल्यासारखे धावपट्टीवर साचलेल्या पाण्याकडे एकटक पाहत, कसाबसा निरुद्देशपणे त्यांचा वेळ घालवत बसले होते किंवा आपापल्या गेटजवळ त्यांची झुंबड उडाली होती. प्रखर कृत्रिम लाइटखाली चमकणाऱ्या किरकोळ विक्रीच्या दुकानांमधून मांडलेली चॉकलेट, परफ्यूम्स आणि दागदागिने दिसत होते. मात्र, ग्राहक नसल्यामुळे ती जवळजवळ ओसच पडली होती. त्या सकाळी प्रवाशांच्या मनात अधिक प्रमाणात भौतिक, सर्वसामान्य विचार होते हे स्पष्टच होतं. या दुकानांऐवजी ते कॉफीशॉपकडे आणि वर्तमानपत्रांच्या स्टॉलकडे जात होते. आजूबाजूच्या आवाजांनी तयार झालेला गोंगाटाचा सर्वसामान्य आवाज विमानतळावरून विमान सुटण्याच्या आणि विमानात बसण्यासाठी अखेरचं बोलावणं करण्याच्या मध्येमध्ये होणाऱ्या घोषणांच्या वेळी थांबत होता.

''ना मृतदेह, ना गुन्ह्याशी संबंध असल्याचं दाखवणारा निर्विवाद पुरावा,'' जॉश आपल्याच मताला चिकटून राहत म्हणाला. यामुळे टॉम भडकणार होता, हे त्याला माहिती असलं; तरीही तो त्यावरच ठाम राहिला होता.

''अक्षरश: काहीही नाही, नाही. पण तू सुचवतोयस त्याप्रमाणे पांढरपेशा लोकांनी केलेल्या गुन्ह्यांतही बळी जातातच. ही अतिशय कंटाळवाणी आणि नेहमीचीच गोष्ट आहे आणि अगदी चुकीचा दृष्टिकोन आहे.''

आता कलात्मक वस्तूंच्या, बौद्धिक संपदांच्या चोरीच्या गुंतागुंतीच्या परिणामांबद्दल डंख मारल्यासारख्या विषारी शब्दांत टॉमकडून उपदेशाचे डोस पाजले जाणार हे त्याला माहिती होतं. एरवीही जॉशला लेक्चर देण्यात टॉमला आनंद वाटत असे आणि नेहमीच अशा असामान्य परिस्थितींमध्ये तसं करताना आपण योग्य तेच करत आहोत, आपलं बोलणं अगदी समर्थनीय आहे, असंही

त्याला वाटत असे.

घड्याळात सकाळ उलटून चालल्याचं दिसत होतं; परंतु जॉशला मात्र तसं वाटत नव्हतं. पाच दिवसांपूर्वी तो लंडनमध्ये आल्यापासून त्याचा सगळा वेळ त्याने त्या छोट्याशा जागेत कोंडल्यासारखा घालवला होता. त्याला झोप घेता आली नव्हती. तो सतत लॅपटॉपकडे नजर टाकत होता आणि जेट-लॅगमुळे आधीच ताण आलेल्या त्याच्या शरीरावर तो आणखी ताण आणत राहिला होता. तो सारखा जांभया देत होता आणि त्याच्या शरीराची ऊर्जा आता जणू काही मोबाइलची ऊर्जा बॅटरीच्या शेवटच्या बारवर आल्यावर वाटते तशी कमी झाली होती. आता त्यालाही पुनर्भारित होण्याची, रिचार्ज होण्याची गरज भासत होती. घरापासून खूपच लांबवर यावं लागलेल्या या ट्रीपचा फारसा उपयोग होणार नव्हता.

त्याने करड्या रंगाच्या टी-शर्टवर हुडी घातली होती. डार्क जीन्स आणि पायात आवाज न करणारे बूट म्हणजेच स्निकर्स घातले होते. त्याच्या एका हातात कॉफीचा कप होता आणि दुसऱ्या हातानं त्याचं काम सुरू होतं. त्याच्या कानांतून आणि पाठीवरच्या बॅगेतून वायर बाहेर लोंबत होत्या. त्यामुळे तो नक्कीच एखाद्या तरुण 'सिलिकॉन व्हॅली' व्यावसायिकासारखा दिसत होता. तो तंत्रज्ञानात आणि संगणकशास्त्रात तज्ज्ञ होताच; परंतु या ट्रीपच्या हेतूचा विचार करायचा झाला तर - फक्त टॉमलाच यात काही हेतू होता असं वाटत होतं, त्याच्या मनात उपरोधानं हा विचार आला.

त्याने केसांतून हात फिरवला.

''अगदी मनापासून सांगायचं झालं तर, टॉम, गुन्हा घडला आहे की नाही याविषयी आपल्याला खात्री नाही. तो पांढरपेशा व्यक्तीनं केला आहे की नाही, हेही आपल्याला निश्चित माहिती नाही आणि इथे मी आपला अर्ध जग पार करून कुठल्या तरी अतिशय वाईट, त्रासदायक ठिकाणी अकारणच, हाती काहीही लागणार नाही, हे माहिती असूनही असल्या निरर्थक गोष्टीचा शोध घेत धावतोय,'' तो म्हणाला.

जॉशच्या मनात चार आठवड्यांपूर्वी भारताला भेट देण्याचा बिलकूल म्हणजे बिलकूलच विचार नव्हता. अशा प्रकारची कोणती योजना तो स्वेच्छेनं बनवेल, असाही त्याने कधी विचार केला नव्हता. 'सिॲटल'मधल्या त्याच्या कार्यालयातल्या कामाचा बोजा संपवून आता आपण वार्षिक सुट्टीसाठी निघू,

असंच त्याने गृहीत धरलं होतं. तेव्हा टॉम या त्याच्या मोठ्या भावाला भेटायला तो 'यूके'मध्ये जाणार असल्यानं त्याच्या मनात अतिशय आनंदी, प्रसन्न भावना भरून आल्या होत्या. मात्र, सध्या त्याच्या मनात ज्या तीव्र संतापाच्या भावना उसळल्या होत्या, त्यांच्या त्या अगदी विरुद्ध होत्या. या काटेरी अपरिहार्यतेमुळे त्रस्त झालेल्या जॉशनं एक सुस्कारा सोडला. पातळ डिस्प्ले स्क्रीनच्या रांगांजवळून तो अगदी मंद पावलं टाकत पुढे गेला. त्या स्क्रीनमधून सतत बदलत्या शब्दांतून वेगवेगळ्या उद्घोषणा केल्या जात होत्या. जगाच्या कानाकोपऱ्यात जाणाऱ्या विमानफेऱ्यांच्या त्या उद्घोषणा होत्या -ॲबर्डिन, ॲमस्टरडॅम, ऑस्टिन...

त्याने सरकत्या जिन्यावर पाऊल ठेवलं आणि त्याच्या पाठीमागून भराभरा येणाऱ्या इतर प्रवाशांच्या घाईकडे दुर्लक्ष करून तो तसाच नाखुशीनं टॉमचं बोलणं ऐकत थांबला.

''हा थिल्लरपणा, पोरकटपणा सोडून दे,'' टॉम खरडपट्टी काढत म्हणाला. ''आम्ही इथे मोठ्या पुराणकालीन वस्तूंची चोरी झाल्याच्या शक्यतेचा सामना करतोय. मी याला अगदी अंधूक शक्यता आहे, असं म्हणेन. इंटरपोलनं मागोवा घेतलेल्या अवैध वाहतुकीच्या गुन्ह्यांपैकी हा तिसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक वाईट गुन्हा आहे. तुला हे माहिती आहे का?''

''तिसरा! यामुळे तर सगळीकडेच हाहाकार माजेल,'' जॉश मिश्कीलपणे डोळे मिचकावत उपहासानं म्हणाला.

''होय. मादक द्रव्य आणि शस्त्रास्त्रं यांच्यानंतरचा!''

''खरंच की काय? तुझे सर्वोच्च तीन गुन्हे हे आहेत? मला वाटलं होतं की, अवैध मानवी तस्करी हा यातला सर्वोच्च गुन्हा असेल.''

त्याच्या या शब्दांमुळे पलीकडे क्षणिक शांतता पसरली. जॉशनं स्वत:शीच स्मित केलं.

तो टॉमला चांगलाच ओळखत होता. जॉशनं ते विधान कितीही आचरटपणे केलं असलं, तरीही त्याच्या या विधानातल्या नैतिक तथ्यामुळे टॉम नक्कीच आश्चर्यचकित झाला होता. त्याने वाचलेल्या नियतकालिकांमध्ये आणि आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांविषयीच्या विद्वत्तापूर्ण लेखांमध्ये देण्यात आलेल्या माहितीचा तो या विधानाशी मनातल्या मनात तुलना करत होता. त्याला वेळ मिळाला रे मिळाला, की टॉम हे संदर्भ पुन्हा पडताळून पाहणारच, याची जॉशला एवढी

खात्री होती की, त्यासाठीच्या पैजेवर त्याने त्याचं आयुष्यही पणाला लावलं असतं.

फोनवर किंचितसा करकर असा आवाज आला. त्यामुळे फोनवर पसरलेल्या शांततेचा भंग झाला. टॉमने नक्कीच त्याची चाकाची खुर्ची जोरात वळवली होती.

टॉमच्या पाठीच्या कण्याच्या खालच्या भागाला मोठी दुखापत झाली होती आणि त्यामुळे वयाच्या एकविसाव्या वर्षापासूनच त्याला चाकाच्या खुर्चीला खिळून राहावं लागलं होतं. वर्षानुवर्षांच्या उपचारांनंतर तो न थकता जेमतेम काही पावलं चालू शकत होता. असं असूनही त्याचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन सदिच्छापूर्ण आणि उत्साही होता. चैतन्यदायी आणि तरीही गंभीर असा त्याचा दृष्टिकोन होता. थोडक्यात, टॉम हा आपल्या कामात यश मिळवण्यासाठी स्वत:ला वाहून घेणारा, सर्वज्ञानी, त्रासदायक भाऊ होता. सहसा असा भाऊ असणं हे कोणाचंही दुर्दैव असतं.

सरकत्या जिन्यावरून बाहेर पडून जॉश क्षणभर थांबला. त्याचं प्रवेशद्वार कुठे होतं ते त्याने पाहिलं.

''ते तिसऱ्या क्रमांकाचं असो किंवा प्राधान्ययादीत अजिबातच नसो, तू त्याचा गांभीर्यानं विचार केलाच पाहिजेस.''

''मला थोडा वेळ दे! मला अगदी असाच मागे फिरून आताच्या आता विमानतळाबाहेर पडण्याचा किंवा पुढचंच विमान पकडून थेट घरी येण्याचा मोह होतोय.''

''मग तू तसं का करत नाहीस? कारण कदाचित काहीही झालं तरी तुलाही इतिहासात आणि कलेत, केवळ सुप्त का असेना, रुची आहे.''

''देवालाच माहिती! त्यापेक्षा भावाविषयीच्या प्रेमाची आणि निष्ठेची अस्थानी भावना माझ्या मनात आहे, हे मी मान्य करतो.'' जॉशनं त्याच्या हातातल्या त्या वेळच्या ब्लॅक कॉफीचा एक मोठा घोट घेतला आणि गरज नसताना खूपच जोरात त्याने तो कचराकुंडीत फेकून दिला. ''तुला कुठल्या तरी अनिश्चित मार्गानं एक जुनीपुराणी वस्तू सापडली. त्यात एवढं काय आहे? कुणीही आरोपी नाहीत. फक्त ती कुठली गोष्ट आहे ती विकत घे आणि ती वाईट प्रकारातून आली असली, तरी तू तिचा आनंद उपभोग. ते काहीही असो, पण मी अगदी पैजेवर सांगतो की, त्या लोकांपेक्षा तूच त्या वस्तूची जास्त चांगली

काळजी घेशील.''

''पहिली गोष्ट म्हणजे, ती 'जुनीपुराणी गोष्ट' नाही,'' जॉश क्षणभर थांबला; ''ती एक प्राचीन मूर्ती आहे.''

''टॉम, माझ्यावर जबरदस्ती करू नको!''

''दुसरी गोष्ट म्हणजे,'' टॉम तसाच कठोरपणे पुढे सांगत राहिला, ''ती कोणत्या प्रकारे संपादित केली आहे त्याला महत्त्व आहे. त्यामुळे लोक दुखावले जातात. खरं तर अनेक पुरातत्त्वीय वस्तू चोरल्या गेल्या होत्या आणि युद्धाच्या दरम्यान त्या दुसरीकडे नेण्यात आल्या. रक्तरंजित कला, रक्तरंजित हिऱ्यांसारखी. इराक, कंबोडिया इथल्या पुराणकालीन वस्तू—''

''अरे बाबा, मला तुझ्या ओघवत्या ज्ञानातून पुढे नेताना तुला खूप आनंद होतोय, नाही का? तुझ्या...तुझ्या...''

''विद्वत्तेमुळे?''

''हॅ! काहीतरीच!'' त्याने मान हलवली. असा वाद घालणं निरर्थक होतं, हे त्याला माहिती होतं. टॉमवर त्याचा काहीही परिणाम होणार नव्हता. जॉश एकोणतीस वर्षांचा होता, पण टॉम त्याच्यापेक्षा फक्त पाच वर्षांनीच मोठा असला तरीही तो, जॉशला तो हायस्कूलचा विद्यार्थी असल्यासारखाच वागवत असे.

''आता बहुतेक तुला आठवडाअखेरीपर्यंत माझं रक्त आणि माझा मृतदेहच मिळेल,'' तो रेकल्यासारखा आवाज काढत म्हणाला.


''अरे जाऊ दे ना, चल.''

त्यानंतर अपेक्षेप्रमाणेच तिथे एक नीरव, गंभीर शांतता पसरली आणि त्या पाठोपाठ जणू काही नुकतीच त्याच्या मनात एखादी शंका तीरासारखी घुसली असावी अशा प्रकारे चाचरत्या आवाजात, जरासा अडखळत आणि साशंकतेनं टॉमनं विचारलं, ''तू... तुला हे धोकादायक आहे असं तर वाटत नाही ना, जॉश? पण भारताच्या कोपऱ्या-कोपऱ्यावर हातात बंदुका घेतलेले गुंड उभे असतात, असं काही नाही.''

''तू मला दिलासा देतोयस की स्वत:ला?'' जॉशनं रुक्षपणे विचारलं आणि नंतर त्याच स्वरात पुढे म्हणाला, ''तसंही मला मनातल्या मनात खूप आजार झालेयत.''

◆

पुस्तकाच्या पानांतून




# ऋणानुबंध

## सुनीता देवस्थळी

मानवी नातेसंबंध...त्यातील गुंतागुंत...रेशीमगाठी आणि दुरावा...भावनिक आंदोलने...यांवर चढवलेल्या शब्दसाजातून साकारलेल्या कथा.

### दुधावरची साय

सकाळी आईचा फोन आल्यापासून उर्वशीची बेचैनी सुरू झाली. दोन दिवसांनी आई आणि दादा महिनाभरासाठी इकडे येतायत. खरं तर उर्वशीने आनंदून जायला हवं होतं. गेल्या महिन्यात श्रीची आत्या आली होती. चांगली पंधरा दिवस राहिली होती. श्रीही जणू तान्हं बाळ झाला होता. पन्नास वर्षांचा झाला तरी आत्याच्या मांडीत डोकं काय घुसळत होता, लाडेलाडे तिच्या खांद्यावर डोकं ठेवून कुरवाळून काय घेत होता! श्रीसुद्धा आत्याच्या तावडीत आणि स्वयंपाकघरही. भाच्याच्या आवडीचं काय करू आणि काय नाही, असं झालं



होतं आत्याचं.

निशीचं काय वेगळं होतं? आत्याआजीच्या पलीकडे कार्टीला काही सुचत नव्हतं. नाही म्हटलं तरी उर्वशीला त्या पंधरा दिवसांत आराम तर मिळालाच होता; पण तरीही काहीतरी खटकत होतं. आपल्या साम्राज्यावर दुसऱ्या कोणी कबजा केल्यासारखं वाटत होतं. शिवाय श्रीच्या बालपणीच्या आठवणी काढत आत्या निशीच्या चांगल्या चांगल्या गुणांना 'तिनं कसं श्रीकडून उचललंय हो!' म्हणून नावाजत. आणि निशी हट्टी आहे, आळशी आहे म्हटलं तर म्हणायच्या, "असा नव्हता हो माझा श्री! कुणाचा बरं हा गुण?" हे म्हणताना खोचक नजर आपल्याकडे!

अस्सा राग यायचा उर्वशीला! 'आता आईला इकडे येऊ दे. चांगला वचपा काढते याचा!' असं त्या वेळी उर्वशी जरी म्हणाली असली, तरी प्रत्यक्षात मात्र आई येणार म्हणताच तिला धडकी भरली.

आईचं सोवळंओवळं, व्रतवैकल्यं, जुनी पारंपरिक मतं आणि मॉड निशी... कसं रेटणार महिनाभर? मुलींनी कसं राहावं, याविषयीची तिची मतं उर्वशीच्या अंगवळणी पडली होती; पण आधुनिक, शहरी विचारांच्या निशीची राहणी, तिचं वागणं, बोलणं यातलं काहीकाही आईला मानवणारं नव्हतं. गेल्या खेपेला आई आली, तेव्हा निशी तशी लहान होती. तेव्हाची गोष्ट वेगळी होती.

शिवाय गैरशिस्त निशीला अस्ताव्यस्त पसाऱ्यात राहायची सवय झालीय. सगळ्या गोंधळातून जे हवं ते हवं त्या वेळी तिला कसं मिळतं, याचं उर्वशीला नेहमीच अप्रूप वाटायचं. एकदा उर्वशीला जरा वेळ मिळाला म्हणून तिने तिची रूम आवरून ठेवली, तर त्या दिवशी निशी गाल फुगवून म्हणाली, "आई, नको गं आवरत जाऊस माझी रूम! माझ्या प्रत्येक गोष्टीच्या जागा ठरलेल्या असतात. तू आवरलंस की, मला शोधाशोध करावी लागते."

आईने येऊन असा तिच्या खोलीत प्रवेश करताच ती म्हणणार, "काय गं हा उकिरडा! वसू, तुझ्याकडून ही अपेक्षा नव्हती! जरा म्हणून रीत लावली नाहीस मुलीला. मुलीची जात तिची. पुढे जाता..." वगैरे वगैरे.

त्यावर निशी म्हणणार, "आजी, माझी रूम आहे ना ही! मी बघीन काय ते. तू येऊ नकोस इथे, म्हणजे झालं! आणि हे मुलीची जात, मुलीची जात काय करतेस? मुलांनी कसंही राहिलं तरी चालतं का? जुनी झाली तुझी मतं आता."

शब्दाने शब्द वाढणार आणि आपलं पुरतं सँडविच होणार! दोन पिढ्यांच्या दोघींमधल्या अंतराला आपण कसे पुरे पडणार? नुसती रस्सीखेच होणार आपली! दोघीही ऐकणार नाहीत. बदलत्या जगाचे बदलते रंग आईला पचणार नाहीत आणि निशीच्या मते, आईच्या 'बुरसटलेल्या' मतांवर निशी तुटून पडणार!

घरात प्रत्येक बाबतीत रंगणाऱ्या तुंबळ युद्धाची उर्वशी कल्पना करत होती. युद्धाची तीव्रता होता होईल तेवढी कमी करण्यासाठी उर्वशी निशीच्या खोलीत धावली.

तिने सभोवताली नजर फिरवली. भिंतीवर लावलेला रणबीर कपूरचा फोटो भराभरा ओढून काढून तिने निशीच्या कॉटखाली कोंबला, बॅक स्ट्रीट बॉइजच्या भिंतीवरच्या सगळ्या गोऱ्या गायकांना कपाटाची अंधारकोठडी फर्मावली, मडोनाचे गातानाचे उघडेवाघडे फोटोज स्टडी टेबलच्या मागे भिंतीच्या सुपूर्त केले. आई आजच येणार असल्यासारखी चादरी-उशा सारख्या केल्या, कॉम्प्युटरवरची धूळ झटकली आणि सहज तिचं लक्ष टेबल कॅलेंडरवर चिकटवलेल्या कागदावर गेलं. हाताने लिहिलेली कविता? निशी कधी कविता करायला लागली? की तिला कोणी... उर्वशीची धडधड एकाएकी वाढली. पोरगी आता तरुण झालीय... कोणी लिहिली असेल? तिच्यासाठी? स्वत:ला सावरत पाहिलं वाक्य वाचत तिने कॅलेंडर हातात घेतलं, 'तुम बहुत खूबसुरत हो'... कोण असेल हा? कार्टीचं लक्षण ठीक नाही. भिरभिरत्या डोळ्यांनी उर्वशीने पुढे वाचायला सुरुवात केली, 'तुम बहुत इंटेलिजन्ट हो.' थरथरणारे पाय सावरत उर्वशी गपकन खुर्चीवर बसली आणि पुन्हा वाचायला लागली.

तुम बहुत खूबसुरत हो,
तुम बहुत इंटेलिजन्ट हो,
तुम बहुत स्मार्ट हो,
अगर तुम्हे ऐसा लागता है,
तो तुम बहुत बेवकूफ हो ।

शेवटचं वाक्य वाचलं आणि एकटी असूनही उर्वशीला खदखदून हसू आलं. क्षणभरापूर्वी आपल्या मनात आलेल्या विचारांनी ती खजील झाली. स्वत:चे पाय जमिनीवर ठेवणाऱ्या या आधुनिक मुलांची आधुनिक सुभाषितं पाहून तिला कौतुक वाटलं. त्यावरची धूळ झटकून तिने ते व्यवस्थित जागेवर

ठेवलं आणि ती निशीच्या वॉर्डरोबकडे वळली. दार उघडताच आतून कशाकशाचा कडेलोट होणार या भीतीने तिने हळूच दार उघडलं. अपेक्षेप्रमाणे निशीच्या बहुतेक सगळ्याच कपड्यांनी तिच्या पायाशी लोळण घेतली. शरण आलेल्यांना तिने उचलून उराशी कवटाळलं आणि कॉटवर बैठक मारली. एकेक कपड्याची घडी घालता घालता मिनी स्कर्ट्स, स्पगेटी टॉप्स, फ्लॅप स्कर्ट वगैरे प्रजेची इतर कपड्यांपासून फारकत केली आणि आई इथे असेपर्यंत तरी त्यांनी बाहेर येऊ नये, यासाठी वॉर्डरोबच्या अगदी खालच्या खणात त्यांच्यासाठी व्यवस्थित जागा केली. बाकीचे कपडे जागेवर ठेवून ती पुस्तकांच्या टेबलाकडे वळली. ड्रॉवर उघडला आणि आ वासून ती त्या ब्रह्मांडाकडे पाहत राहिली. पंधरा-वीस फ्रेन्डशिप बँड्स, रबर्स, पेन्सिली, पेनं, पैसे, शार्पनर, कागदांचे बोळे, सिनेमाची जुनी तिकिटं, लॉकेट्स, इअररिंग्ज, ब्रेसलेट्स, कॅल्क्युलेटर, हेअर पिन्स, हेअर बँड्स, दोन-चार सीडीज, पेन ड्राइव्ह, स्केच पेनं, आयडेंटिटी कार्ड्स, तीन-चार प्रकारच्या की-चेन, त्यांच्यापासून विभक्त झालेले सुपरमॅन, डॉल, घुंगरू वगैरे वगैरे... त्या ड्रॉवरची सामावून घेण्याची कॅपॅसिटी आणि त्यातून हवं तेव्हा हवं ते शोधून काढू शकणारी निशीची शोधक नजर, दोन्हीचं कौतुक करत तिने ड्रॉवर तसाच बंद केला. सगळे फ्रेंडशिप बँड्स आणि सुपरमॅन वगैरे प्रजेला कचऱ्याच्या डब्यात टाकण्याची स्तुत्य आयडिया उर्वशीला सुचली होती; पण निशीच्या मते, त्यांची असलेली 'सेंटिमेंटल व्हॅल्यू' जपण्यासाठी तिने तो मोह आवरला. वरच्या फळीवर जॅकी कॉलीन, सिडनी शेल्डन आणि हॅरी पॉटर यांना जागच्या जागी ठेवल्यावर उर्वशीने थोडा श्वास घेतला. मुख्य सेन्सिटिव्ह एरिया तिने 'तुका म्हणे त्यातल्या त्यात' आईच्या दृष्टीला खटकणार नाही असा केला आणि आईच्या स्वागताच्या दृष्टीने इतर तयारीला लागली.

"ममा, व्हेअर इज माय स्वीटू?" जवळजवळ किंचाळलेला निशीचा आवाज ऐकून उर्वशी धावतच तिच्या रूममध्ये गेली. रणबीर कपूरचा फोटो लावलेल्या भिंतीकडे भकास नजरेने बघत निशी विचारत होती.

"बेटा, आजी येतेय ना परवा, तिला ते नाही आवडणार म्हणून मी तो काढला. तुझ्या कॉटखाली ठेवलाय. ती परत गेली की परत लावू. ओके?" उर्वशी समजावणीच्या स्वरात म्हणाली.

"सो व्हॉट, ममा? मला पण आजीच्या काही थिंग्स आवडत नाहीत.

आय रिमेंबर, टू-टू अवर्स ती गॉडपाशी बेल वाजवत मोठ्यामोठ्याने प्रेअर म्हणते. किती डिस्टर्ब होतं माहितीय? आय डोन्ट लाइक दॅट.''

''मला समजतंय बेटा; पण ती माझी आई आहे. माझ्यासाठी एवढं समजून घेशील ना?''

''आय हेट ऑल धिस.'' म्हणत पाय आपटत निशी तिथून निघून हॉलमध्ये टीव्हीपाशी जाऊन बसली.

''मग काय, आई येणार म्हणून खूश दिसतंय एक जण.'' पाय आपटत जाणाऱ्या निशीकडे पाहत श्री उर्वशीला मिश्किलपणे विचारत होता.

'अब जो होगा वो देखा जायेगा,' असा विचार करत उर्वशी निमूटपणे कामाला लागली.

आई-दादा आल्यानंतरचे दोन दिवस शांततेत गेले. आई आल्या आल्या निशीने जाहीर केलं...

''आजी, देवाची पूजा सध्या मीच करते.''

एकाच वेळी या वाक्यासरशी श्री, उर्वशी, दादा, आई सगळेच हादरले. उर्वशीच्या आ वासलेल्या तोंडाची पर्वा न करता निशी आजी बसली होती तिथे धावत गेली. गुडघ्यावर बसून तिच्या मांडीत डोकं घुसळत ती पुढे म्हणाली, ''आजी, तू आली आहेस तर आराम करायचा. अगदी पूजासुद्धा करायची नाही. टीव्ही बघ, झोप, आराम कर, मस्त फिर. काय आजोबा! आजीबरोबर एन्जॉय करणार ना?''

''मोठी झाली हो माझी बाय ती!'' आईने तिला गोंजारत कानाशी काड्या मोडल्या. ''करीन हो, तू म्हणतेस तर आराम करीन, तसंही हल्ली जरा काम पडलं, की थकायला होतं.''

''म्हणून तर म्हटलं ना, अगदी देवाची बेलही हातात घेऊ नकोस.''

''घंटा म्हणतात बाळ त्याला.''

''तेच ते. कशाला टिंगटिंग करत हात दुखवायचे?''

''पद्धत आहे बाळा देवपूजेची.''

''त्यामुळे काय होतं?''

''देव जागे होऊन पाहत असतील कोण पूजा करतंय ते.''

''झोपलेल्याला असं डिस्टर्ब करत नाहीत ना आजी.''

''वेडाबाई, देव कधी झोपतो का?''

''तूच तर म्हणालीस, देव जागे होऊन पाहत असतील.''

''शब्दांत पकडते हो वसू तुझी मुलगी. हुशार आहे हो, अगदी बापाच्या वळणावर गेलीय.''

'ब्रूटस यू टू!' असं ओरडावंसं वाटलं उर्वशीला. आत्या तर आत्या, आईसुद्धा! पण तेवढ्यात ''मी शब्दांत पकडतो की काय तुम्हाला?'' या श्रीच्या वाक्यासरशी सगळे खळाळून हसले आणि कसं का होईना, आईचं येणं तरी सुरळीत पार पडलं, या विचाराने उर्वशीही हसण्यात सामील झाली.

आई येऊन आठ दिवस झाले, तरी घरात पूजेची घंटा किणकिणली नाही. उर्वशीला थोडं चुकल्याचुकल्यासारखं झालं. नाही म्हटलं, तरी तो घंटानाद तिच्या बालपणीच्या आठवणींशी निगडित होता. उर्वशी लहान असताना पहाटेची जाग तिला त्या घंटानादानेच तर येत होती. उठल्याउठल्या कसं प्रसन्न वाटायचं. बाहेर चिवचिवणारा पक्ष्यांचा आवाज आणि घरात पूजेचा घंटानाद. उर्वशीच्या दिवसाची सुंदर सुरुवात व्हायची. हल्ली सिमेंटच्या या ठोकळ्यांमध्ये पक्षी फारसे दिसत नाहीत आणि आई घरात असूनही घंटानाद नाही.

निशी देवाची पूजा कशा प्रकारे करत होती, ते तो देवच जाणे! पण फुलं, निरांजन आणि उदबत्तीने देव सुशोभित आणि वातावरण सुगंधित होत होतं, हे मात्र खरं. सोबतीला 'रघुपती राघव राजाराम'चं पॉप म्युझिक आयपॉडवरून एका कानात आणि कानातून तोंडाद्वारे बाहेर पडत होतं. सोबतीला आजी चिपळ्या वाजवल्यासारखे हात करून तिच्या सुरात सूर मिसळत होती.

''ही कुठली गं चाल 'रघुपती राघव'ची?''

''मॉडर्न फ्यूजन आहे ते, आजी.''

''छान वाटतंय. आतून तालावर डोलण्याची ऊर्मी येतेय, नाही?''

''तुझ्या कानात हे घालून ऐक.'' असं म्हणून निशीने इअरप्लग आजीच्या कानात सरकवले; तसे आजीने ते पटकन दूर केले.

''बाई गं, कान फाटतील. किती तो मोठा आवाज! आणि येतोय कुठून?''

निशीने टी शर्टच्या खिशातून ते दोनइंची यंत्र बाहेर काढून आजीला

दाखवलं, ''यातून.''

''यातून? एवढ्या छोट्या यंत्रातून? ऐकावं ते नवलच बाई!''

''आता जग छोटं छोटं होतंय आजी. घे, आवाज बारीक करते. ऐक.''

आजीने कानाला यंत्र लावलं आणि डोलतडोलत ती हॉलमध्ये गेली.

तव्यावर टाकलेली पोळी जळाली, तरी उर्वशी हे सारं बघत उभी राहिली. सहज तिचं लक्ष निशीकडे गेलं. ती डोळे मिचकावून हसत होती.

''वाकडंतिकडं नाचायला आज काय अंगात आलेलं दिसतंय.'' तिकडे दादा हॉलमध्ये आईकडे विचित्रपणे पाहात विचारत होते. आईने एक इअरप्लग शेजारी बसून त्यांच्याही कानाला लावला आणि दोघंही 'रघुपती राघव'मय झाले.

''मला सांग आजी, काय वाईट आहे यात?''

''अगं, असं मांड्या दाखवत नाचणं बरं दिसतं का?''

''अख्खंच्या अख्खं माणूस दिसतं, ते न पाहता तुम्ही फक्त मांड्याच का पाहता?''

''अगं निशी, ते साहजिकच नाही का?''

''नाही. तो आपल्या नजरेचा दोष आहे.''

टीव्हीवर 'कहो ना प्यार है' पाहता पाहता निशी आणि आजी-आजोबांचा 'सुखसंवाद' सुरू झाला आणि उर्वशीने कान टवकारले.

''बरं, मानलं की नजरेचा दोष आहे; पण ती माणसाची सहजप्रवृत्ती नाही का? कशाला त्या नट्यांनी असे उत्तेजक कपडे घालायचे?''

''आपण ना हृतिक रोशनचा आदर्श ठेवला पाहिजे, आजी. अख्खा नाच ती त्याच्यापुढे नाचली; पण त्याने एकदा तरी पाहिलं का तिच्या मांड्यांकडे?''

निशीच्या या वक्तव्याला आजी-आजोबांनी मान्यता दिली आणि उर्वशीने कपाळाला हात मारला.

''पण तरीही मुलींना शोभत नाहीत असले कपडे,'' आजीने तरीही स्वत:चा मुद्दा पुढे मांडला. ''पूर्वीच्या सिनेमात नव्हते बाई हिरोईनचे असले कपडे!''

''असलं नाचण्यासाठी स्पेशली कॅब्रे डान्सर्स असायच्या बरं का, निशी.''

आजोबांनी पुष्टी जोडली.

''पण त्याही मुलीच ना?'' – निशी.

''हो, पण त्यांनी तो पेशा म्हणून निवडला होता ना!'' – आजोबा.

''मग या हिरोईनला कुणी फोर्स केलाय का? तिचाही तो तुम्ही म्हणता तसा पेशाच आहे ना?''

''तुझ्यापुढे ना बाई!...'' आजीने कोपरापासून हात जोडले. ''बोलण्यात कशी हां-हां म्हणता हरवतेस बघ!''

''पण त्या वेळचे कॅब्रेसुद्धा अश्लील नव्हते. हेलन तर काय नाचायची सांगतो तुला!'' आजोबा हार न मानता म्हणाले.

''असं कोण म्हणतं?'' – निशी

''पेपरातच परीक्षण यायचं तसं.'' – आजोबा

''म्हणून तुम्ही म्हणता? कॅब्रे तो कॅब्रेच! त्यातून तसं काही अपील होत नसतं, तर ठेवले कशाला असते पिक्चरमध्ये? कोणी काहीही लिहितो आणि आपण मान्य करतो.'' निशी पुढे म्हणाली, ''असं काय या पिक्चरमध्ये अश्लील आहे, जे हेलनच्या कॅब्रेत नाही? हल्लीच्या जनरेशनला ठेवायची म्हणून नावं ठेवता. प्रत्येक नेक्स्ट जनरेशन बदलतेच आहे ना? तुम्हीही तुमच्या आधीच्या जनरेशनपेक्षा बदललातच की!''

''काय बदललो बाई आम्ही?'' कौतुकाने नातीकडे पाहत आजी विचारत होती.

''हे बघ आजी, तुझी आई नऊवारी नेसायची, तू पाचवारी नेसतेस, ममा पंजाबी ड्रेस घालते आणि मी स्कर्ट. हे अपेक्षित नाही का?'' निशीने समजावलं.

''आणखी पुढच्या पिढीकडून काय अपेक्षा आहेत?'' आजोबांनी मिश्कील हसत विचारलं.

''ते त्यांचं त्या बघतील ना! आपण कशाला बॉदर करायचं? ज्या त्या वेळच्या लोकांनी ज्या त्या वेळेप्रमाणे ड्रेस घालावेत. हो की नाही?'' आजी-आजोबांनी होकारार्थी मान झुलवताच निशी जागची उठली.

''ममा, रिंकीकडे रात्री बर्थडेची डिनर पार्टी आहे. नाइन थर्टीपर्यंत परत येईन.'' असं म्हणत ती तयार व्हायला रूममध्ये पळाली सुद्धा!

तशी निशी आणि आई-दादा एकमेकांशी व्यवस्थित जुळवून घेत असल्याची आतापर्यंत जरी उर्वशीला खात्री पटलेली असली, तरीही आता निशी कोणत्या

अवतारात बाहेर पडेल आणि त्यावर आईची प्रतिक्रिया काय असेल, या धाकधुकीत उर्वशी हॉलमध्येच बसून राहिली.

''वसूची पोरगी चुणचुणीत आहे. अगदी वसूसारखी.'' तिची आई दादांना सांगत होती. वसूकडे पाहून तिने विचारलं, ''काय गं वसू, ही बर्थडे पार्टीला जातेय; पण हल्ली ऐकतो ती रेव्ह पार्टी काय असते?''

निशीने तेवढ्यात रूमचा दरवाजा उघडला आणि तिथूनच मोठ्याने ओरडून ती आजीला म्हणाली, ''आजी, मी आज जातेय ती पार्टी आणि रेव्ह पार्टीमध्ये पूर्वीच्या हिरोईन आणि कॅब्रेडान्सरइतका फरक आहे. मी हिरोईनवाल्या पार्टीला जातेय. डोन्ट वरी.''

उर्वशीने पाहिलं, आई-दादा मान डोलावून हसत होते. तिला हायसं वाटलं... आता राहीनात आई-दादा इकडे कितीही...


**(माहेर – जुलै, २००८)**

◆

**नवी संहिता... नवा आशय...**

**असा लुटला**
**भारत**

**रॉय मॉक्झॅम** । अनुवाद **सरिता आठवले**




भारतीय बाजारपेठेवरील वसाहतवाद्यांचं आक्रमण...तीन शतकांच्या धगधगत्या इतिहासावर प्रकाशझोत टाकणारं संशोधन

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## नवी संहिता... नवा आशय...

### द गर्लफ्रेंड

**मिशेल फ्रॅन्सेस**

अनुवाद
**उज्ज्वला गोखले**





ती आली, तिने पाहिलं; पण ती जिंकणार त्यापूर्वीच, त्याची आई तिच्या मनसुब्यांना सुरुंग लावते आणि मग सुरू होते कुरघोडींची एक चित्तथरारक कथा...

**किंमत : ७००/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**

### गॉन गर्ल


**गिलियन फ्लिन**
अनुवाद
**सई साने**




स्वत:च्याच खुनाचा बनाव रचला ॲमीने...तिच्या नवऱ्याला निक्‌ला अडकवण्यासाठी... निक्‌ही देऊ पाहात होता शह...ॲमी-निक्‌च्या परस्परांवरील कुरघोड्यांचं रंगतदार, थरारक चित्रण...

**किंमत : ७५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**पु स्त का च्या पा नां तू न**




# ऑनर अमंग थीव्ह्ज

## जेफ्री आर्चर

अनुवाद
**सई साने**

जेफ्री आर्चरच्या खुमासदार शैलीत पानापानांतून उलगडत जाणारी उत्कंठावर्धक कादंबरी.

### मानवी घटनाक्रमादरम्यान...

*न्यू यॉर्क, फेब्रुवारी १५, १९९३*

अंतोनियो कावाली समोरच्या अरबाकडे रोखून बघत होता. उप-राजदूत म्हणून तो वयानं फारच लहान वाटत होता.

''दहा कोटी डॉलर्स'' प्रत्येक शब्द अगदी आदराने, सावकाश आणि स्पष्टपणे उच्चारत कावाली म्हणाला.

हमीद अल ओबेदीनं त्याच्या छान काळजी घेतलेल्या अंगठ्याच्या टोकानं माळेतला मणी पुढे ढकलला. त्याच्या टिकटिकीनं कावालीला आता



चीड यायला सुरुवात झाली होती.

''दहा कोटी ही रक्कम तशी ठीक आहे.'' त्याच्या त्या तुटक इंग्रजी उच्चारात उप-राजदूतानं म्हटलं.

कावालीने मान डोलवली. त्याला फक्त एकाच गोष्टीची काळजी वाटत होती, ती म्हणजे अल ओबेदीनं एवढीशीही घासाघीस केली नव्हती. खरं तर त्याला प्रत्यक्षात अपेक्षित असणाऱ्या रकमेच्या दुप्पट रक्कम त्यानं सांगितली होती. आजपर्यंतच्या काही कटू अनुभवांवरून कावाली एक गोष्ट नक्कीच शिकला होता की, जो घासाघीस करत नाही त्याच्यावर विश्वास ठेवायचा नाही. घासाघीस नाही याचा नक्की अर्थ असा की, मुळात समोरच्याची ती रक्कम देण्याचीच तयारी नाही.

''जर रकमेबद्दल प्रश्न नसेल तर फक्त आता ती कशी आणि कधी द्यायची एवढंच ठरवायचं बाकी राहिलं,'' तो म्हणाला.

उप-राजदूताने आणखी एक मणी सरकवत मान डोलवली.

''एक कोटी लगेच रोख द्यायचे,'' कावाली म्हणाला, ''आणि कामगिरी पूर्ण झाल्यावर उरलेले नऊ कोटी स्विस बँक खात्यात जमा व्हायला हवेत.''

''पण माझ्या पहिल्या एक कोटी डॉलर्सच्या बदल्यात मला काय मिळणार?'' उप-राजदूताने कावालीकडे नजर रोखून विचारलं. त्याच्याप्रमाणेच त्याच्या समोरच्याचाही मूळ वंश लपणं अवघड होतं.

''काहीच नाही.'' कावाली उत्तरला. कावालीला कल्पना होती की, समोरच्या अरबाला हा प्रश्न विचारण्याचा पूर्ण अधिकार आहे, कारण जर कावालीने त्या सौद्यामधला त्याचा भाग पूर्ण केला नसता तर या उप-राजदूतानं केवळ सरकारी पैसेच नाही, तर इतरही बरंच काही गमावलं असतं.

अल ओबेदीनं आणखी एक मणी पुढे ढकलला. आपल्यापुढे फारसे पर्याय नाहीत याची त्याला पूर्ण कल्पना होती – अंतोनियो कावालीबरोबर नुसत्या भेटीची संधी मिळवण्यातच त्याची दोन वर्षं गेली होती. दरम्यानच्या काळामध्ये राष्ट्रपती क्लिंटन 'व्हाइट हाउस'मध्ये व्यवस्थित स्थिरावले होते, तर त्याचा स्वतःचा नेता मात्र सूडासाठी उतावीळ होत होता. त्यानं जर अंतोनियो कावालीच्या शर्ती मान्य केल्या नसत्या तर चार जुलैपूर्वी कामगिरी पूर्ण करू शकेल, अशी त्याच्या तोडीची व्यक्ती मिळणं हे जुगारामध्ये रुलेटच्या चाकावर शेवटच्या संधीला शून्य येण्याइतकंच कठीण होतं.

उप-राजदूताच्या मागची भिंत व्यापलेल्या चित्रातल्या व्यक्तीकडे कावालीनं नजर टाकली. त्याची आणि अल ओबेदीची भेट झाली तेव्हा युद्ध संपून थोडेच दिवस झाले होते. त्या वेळी या अमेरिकन माणसानं ओबेदीशी कोणताही व्यवहार करणं टाळलंच होतं. प्राथमिक भेटीपर्यंत तरी उप-राजदूताचा नेता जिवंत असेल की नाही याविषयी अनेक लोकांना शंका होती.

पण काही महिने उलटले आणि आपलं संभाव्य गिऱ्हाईक कदाचित राष्ट्रपती बुश यांच्यापेक्षाही जास्त तग धरेल,असं कावालीच्या लक्षात आलं. म्हणून मग आता ही चाचपणी स्वरूपाची भेट ठरवली होती.

उप-राजदूतांच्या न्यू यॉर्कमधल्या ईस्ट-७९ रस्त्यावरचं कार्यालय हे भेटीचं ठिकाण ठरवलं गेलं. खरंतर कावालीच्या दृष्टीनं तिथे खासगीपणा जरा कमीच होता; पण या धाडसी कामगिरीत दहा कोटी डॉलर्स ओतायला राजी असणाऱ्या पार्टीची तयारी त्यातून कळत होती.

''पहिले एक कोटी तुम्हांला कशा स्वरूपामध्ये अपेक्षित आहेत?'' जणू काही एखाद्या घराच्या दलालाला ब्रुकलीन ब्रिजच्या पलीकडे असणाऱ्या छोट्याशा घराच्या आगाऊ रकमेबद्दल विचारावं, अशा थाटात अल ओबेदीनं विचारलं.

''संपूर्ण रक्कम ही वापरलेल्या आणि न नोंदवलेल्या शंभर डॉलर्सच्या नोटांमध्ये न्यू जर्सीमधल्या 'नेवार्क'च्या आमच्या बँकेमध्ये जमा करायची.'' डोळे बारीक करत अमेरिकन उत्तरला. ''आणि मि. ओबेदी,'' कावाली पुढे म्हणाला, ''मी तुम्हांला हे सांगायला नकोच की, आमच्याकडे असलेली मशीन्स व्यवस्थित तपासणी...''

''आम्ही आमचा शब्द पाळू की नाही याबद्दल तुम्ही काळजी करण्याची मुळीच गरज नाही,'' अल ओबेदीनं मध्येच म्हटलं, ''ही रक्कम म्हणजे तुम्ही पाश्चिमात्य म्हणता तसा समुद्रातला एक थेंब आहे. मला फक्त एकाच गोष्टीची काळजी आहे आणि ती म्हणजे या सौद्यामधली तुमची जबाबदारी तुम्ही पार पडू शकाल की नाही.''

''आमच्या योग्यतेविषयी जर तुमच्या मनात शंका असती तर तुम्ही आमच्या भेटीसाठी इतका पाठपुरावा केला नसता.'' कावालीनं लगेच प्रत्युत्तर दिलं. ''पण इतक्या थोडक्या वेळामध्ये इतकी मोठी रक्कम तुम्ही जमा करू शकाल, याची खात्री मी बाळगू शकतो ना?''

''तुम्हांला कदाचित हे जाणून घ्यायला आवडेल मि. कावाली की, पैसे

केव्हाच संयुक्त राष्ट्रांच्या इमारतीच्या तळघरात असलेल्या तिजोरीत येऊन पडले आहेत. काय आहे की, अशा दिवाळखोरीत गेलेल्या संस्थेच्या तिजोरीत एवढी रक्कम असण्याची कोणाचीच अपेक्षा नसेल; नाही का?'' अरब स्वतःच्याच हजरजबाबीपणावर खूश झाला आहे, हे अल ओबेदीच्या चेहऱ्यावर रेंगाळणारं स्मित सुचवत होतं; पण कावालीचे ओठ मात्र जराही हलले नव्हते.

''उद्या दुपारपर्यंत एक कोटी तुमच्या बँकेमध्ये जमा झालेले असतील,'' त्याच्यापुरती तरी ही भेट संपली आहे, हे दर्शवण्यासाठी जागेवरून उठत अल ओबेदी म्हणाला. उप-राजदूताने आपला हात पुढे केल्यावर त्याच्या पाहुण्यानं जरा अनिच्छेनेच तो हातात घेतला. कावालीने पुन्हा एकदा सद्दाम हुसेनच्या चित्राकडे नजर टाकली आणि वळून तो झपाट्यानं बाहेर पडला.

❧

स्कॉट ब्रॅडलीनं वर्गात प्रवेश केला तेव्हा तिथे एक उत्सुकतापूर्ण शांतता पसरली होती. समोरच्या टेबलावर स्वतःच्या नोंदी ठेवताना त्यानं संपूर्ण वर्गावर नजर फिरवली. समोर असलेल्या पिवळ्या वह्यांवर पेन आणि पेन्सिली सरसावून बसलेल्या उत्सुक तरुण विद्यार्थ्यांनी समोरचा वर्ग खचाखच भरला होता.

''माझं नाव स्कॉट ब्रॅडली.'' विधी महाविद्यालयातला तो सगळ्यात तरुण प्राध्यापक स्वतःची ओळख करून देत म्हणाला, ''घटनात्मक कायद्याबद्दल होणाऱ्या चौदा व्याख्यानांपैकी हे पहिलं व्याख्यान असणार आहे.'' चौऱ्याहत्तर चेहरे एकत्रितपणे त्याच्याकडे निरखून बघत होते. त्यांना समोरचा माणूस उंच, काहीसा अजागळ भासत होता. आपल्या शर्टाचं वरचं बटण नसल्याची जाणीवदेखील बहुधा त्याला नसावी आणि सकाळी भांग पाडत असताना केस नक्की कोणत्या बाजूला वळवायचे याबद्दल संभ्रम झाला असावा, असं आता त्याच्याकडे बघून वाटत होतं.

''माझं हे पहिलं व्याख्यान, मी एक व्यक्तिगत विधान करून सुरू करू इच्छितो.'' त्यानं बोलायला सुरुवात केली. काही पेनं आणि पेन्सिली उभ्याच्या आडव्या झाल्या. ''या देशामध्ये 'वकिली पेशा' निवडायची अनेक कारणं आहेत,'' तो म्हणाला, ''पण तुमच्यासाठी महत्त्वाची आणि मला ज्यामध्ये रस आहे अशी एकच गोष्ट आहे. ज्या कायद्याचा तुम्ही अभ्यास करू इच्छिता, त्याच्या प्रत्येक पैलूला ती गोष्ट लागू पडते आहे. अमेरिकेच्या तेरा संयुक्त राज्यांनी एकमतानं जो स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार केला त्याच्या मसुद्यामध्ये

ती अतिशय उत्कृष्टपणे व्यक्त केली आहे.

'ही सत्यं स्वयंसिद्ध आहेत हे आपण गृहीत धरतो. आपण हेही धरून चालतो की, सर्व मानवांची निर्मिती ही समान तत्त्वांवर झालेली असून, त्यांच्या निर्मिकानं त्यांना कधी न हिरावले जाणारे असे काही हक्क बहाल केलेले आहेत; जीवन, स्वातंत्र्य आणि सुखाचा शोध हे त्यांपैकी काही आहेत.' या एका वाक्यामुळे अमेरिका जगाच्या पाठीवरील इतर देशांपेक्षा वेगळी ठरते.

''काही गोष्टी अशा आहेत ज्यामध्ये १७७६ नंतर आपल्या देशाने प्रचंड प्रगती केली आहे; पण काही गोष्टींमध्ये मात्र आपण झपाट्यानं मागे गेलो आहोत,'' प्राध्यापकाचं बोलणं सुरूच होतं. आपल्या जुनाट हॅरिस ट्विड जॅकेटची टोकं खेचत, एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत फेऱ्या मारत असताना अजूनही त्यानं आपल्या नोंदी उघडल्या नव्हत्या. ''या दालनामध्ये आज हजर असलेल्यांपैकी प्रत्येकजण हा कायदे करणाऱ्या किंवा कायदे मोडणाऱ्या पुढच्या पिढीचा एक भाग असू शकेल–'' क्षणभर थांबून त्यानं समोरच्या शांतपणे त्याचं व्याख्यान ऐकणाऱ्या चेहऱ्यांकडे नजर टाकली. ''–आणि ही निवड करण्यासाठी तुम्हांला एक अद्वितीय देणगी बहाल करण्यात आलेली आहे, आणि ती म्हणजे तुमचं सुजाण मन! जेव्हा माझ्या सहकाऱ्यांबरोबर माझं तुमच्यावरचं काम पूर्ण होईल आणि बाहेरच्या त्या खऱ्याखुऱ्या जगामध्ये तुम्ही पाऊल टाकाल तेव्हा तुम्हांला वाटलं तर त्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याकडे तुम्ही पूर्णपणे दुर्लक्ष करू शकता. जणू काही आजच्या या आधुनिक जगामध्ये तो इतका कालबाह्य आणि अप्रासंगिक आहे की, ज्या कागदावर तो लिहिला आहे, त्या कागदाइतकीसुद्धा त्याला किंमत नाही किंवा...'' प्राध्यापक पुढे म्हणाले, ''तुम्ही पुढे जाऊन कायद्याचं पालन करण्याचीदेखील निवड करू शकता. श्रेष्ठ वकील या मार्गाने जातात. वाईट वकील, आणि मी मूर्ख वकील असं म्हटलेलं नाही हे कृपया लक्षात घ्या, तर वाईट वकील जे कायदे वाकवतात; माझ्या मते कायदे मोडण्याची ती सुरुवात असते. या वर्गात त्या वाटेने जाण्याच्या विचारात जे कोणी आहेत त्यांना माझं असं सांगणं आहे की, तुम्हांला शिकवण्यासारखं माझ्याकडे काहीच नाही; कारण तुम्ही शिकवण्याच्या पलीकडे आहात. तुम्ही माझ्या वर्गात उपस्थित राहू शकता; पण 'उपस्थित राहणं' एवढंच काय ते तुम्ही करू शकाल.''

वर्गात इतकी शांतता पसरली होती की, सगळे वर्गात आहेत की बाहेर

गेले या शंकेने स्कॉटनं मान वर करून बघितलं. ‘‘हे माझे शब्द नाहीत,’’ त्या एकाग्र चेहऱ्यांकडे पाहत त्यांनी म्हटलं, ‘‘हे शब्द डीन थॉमस डब्ल्यू स्वान यांचे आहेत. त्यांनी या शतकाच्या सुरुवातीच्या सत्तावीस वर्षांत याच वर्गात व्याख्यानं दिली. या येल महाविद्यालयाच्या नवीन विद्यार्थ्यांना संबोधायची मला जेव्हा संधी मिळते तेव्हा मी त्यांचे विचार पुनःपुन्हा उद्धृत करतो.’’

आता पहिल्यांदाच प्राध्यापकानं त्याच्या पुढची फाइल उघडली आणि बोलायला सुरुवात केली. ‘‘तर्कशास्त्र म्हणजे योग्य प्रकारे तर्क बांधण्याची कला आणि विज्ञान. तुम्हांला वाटतं, सामान्य व्यवहारभानापेक्षा त्यात फारसं अधिक काही नसणार; मला कळतंय तुम्हांला काय वाटतं ते आणि वोल्टेअरने म्हटल्याप्रमाणे त्यात दुर्मिळ असं काहीच नाही; पण सामान्य व्यवहारभानाचं तुणतुणं वाजवणारे लोक स्वतःच्या मनाला प्रशिक्षण देण्याचा आळस करतात.’’


‘‘ऑलिव्हर वेन्डेल होम्सनं एकदा लिहिलं होतं : कायद्याचं सत्त्व म्हणजे तर्क नव्हे, तर अनुभव.’’ पिवळ्या पानांवर पेन आणि पेन्सिलींनी आता भराभर खरडायला सुरुवात झाली होती. पुढली पन्नास मिनिटं ते चित्र तसंच होतं.

स्कॉट ब्रॅडलीनं आपलं व्याख्यान संपवलं,आपली फाइल उचलली; नोंदींचे कागद गोळा केले आणि तो झपाट्याने वर्गाबाहेर निघून गेला. गेली दहा वर्षं अव्याहतपणे त्याच्या पहिल्या व्याख्यानाच्या शेवटी टाळ्यांचा कडकडाट होत असे; पण त्याला पर्वा नव्हती.

◆

अभिप्राय

## 'डॅम इट आणि बरंच काही'




'डॅम इट आणि बरंच काही' हे पुस्तक म्हणजे महेश कोठारे ह्या व्यक्तिमत्त्वाचा भारतीय चित्रपट सृष्टीतील प्रवास. हे पुस्तक वाचता वाचता आपण कधी या प्रवासाचा भाग होतो, हे कळतंही नाही. अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, महेश कोठारे, सचिन ही मराठी सिनेसृष्टीतील बाप माणसे. यांच्याशिवाय ही सिनेसृष्टी अपूर्ण आहे. या पुस्तकात कुठेही 'मी पणा' जाणवत नाही. स्वत: महेश कोठारे आपल्याशी संवाद साधतात, असे वाटते. 'धुमधडाका' बनवतानाची त्यांची झालेली त्रेधातिरपीट, तळमळ, जिद्द, आनंद आपल्याला वाचताना जाणवतो. मी तर पुढे जाऊन म्हणेन की, फक्त 'धुमधडाक्या'च्या कहाणीवर एक सिनेमा बनेल. लोक सिनेमा पाहतात; पण महेशजी सिनेमा जगतात. पुस्तकात फक्त चांगलं तेच लिहिलंय, असं नाही तर त्याचबरोबर अपमान, टेन्शन, नुकसान, आयुष्यात झालेल्या चुका सर्वांचा समावेश आहे. 'धुमधडाका', 'दे दणादण', 'थरथराट', 'धडाकेबाज', 'झपाटलेला' ह्याबद्दल वाचताना, अगदी मी माझ्या भूतकाळात रमून गेलो होतो, आणि 'थरथराट'च्या प्रीमियरचा तो किस्सा मला आठवला. 'थरथराट'चा 'प्रभात' मध्ये प्रीमियर होता. तुडुंब गर्दीत मी आणि माझा भाऊ आपल्या लाडक्या कलाकारांना म्हणजेच महेश, लक्ष्याला बघायला गेलो. 'प्रभात'च्या त्या कठड्यावरून बघताना चप्पल




निसटली; कारण काठी बसली हो! हा किस्सा मी १६ फेब्रुवारीला मेहता पब्लिशिंग हाऊसच्या कार्यक्रमाला महेश कोठारे आले होते तेव्हा त्यांना सांगितला आणि ते खूप हसले. या पुस्तकात मी शोधत होतो ते लक्ष्मीकांत-बद्दलचे किस्से. ते वाचताना मजा तर येतेच; पण लक्ष्मीकांत गेल्यानंतरची महेश कोठारेंची मानसिकता वाचताना तुमच्या डोळ्यांतही अश्रू येतील. पुस्तकात काही दुर्मिळ फोटोही आहेत ते पाहताना पण खूप मजा येते. पुस्तक वाचता वाचता कधी संपते ते कळत नाही. पण एक गोष्ट जाणवली,जी दुसऱ्या आवृत्तीबद्दल विचार करावा अशी. शेवटी महेश कोठारे यांनी केलेल्या सिनेमांची यादी आहे, त्यामध्ये 'गुपचूप गुपचूप' चं नाव नाही.

'डॅम इट आणि बरंच काही' हे पुस्तक नक्की वाचा. एक मस्त पर्वणी आहे.

**– अमोल भट**

## ऐतिहासिक मराठी स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाचा वेध

स्त्रीचे विश्व हे 'चूल आणि मूल' एवढ्यापुरतेच मर्यादित नसते, याची उदाहरणे आपल्याला इतिहासातसुद्धा पाहायला मिळतात. इतिहासात डोकावून पाहिले तर स्त्रियांचे आयुष्य हजार बंधनांनी जखडलेले होते. लहान वयातच मुलीचे लग्न केले जात असे. सतीची चाल, विधवांना केशवपनाची सक्ती, सती जाणाऱ्या स्त्रियांच्या मरणाइतकेच सती न जाणाऱ्या विधवांचे जगणे भयंकर होते. अशा समाजातच काही स्त्रिया अशासुद्धा होऊन गेल्या ज्यांनी आपल्या कार्याने, आपल्या धाडसाने, शौर्याने महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचे योगदान दिले. समाजाचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यात ज्यांचा मोलाचा वाटा आहे, अशाच काही निवडक स्त्रियांचे चरित्र रेखाटन गोपाळ देशमुख यांनी 'मराठी दौलतीचे नारी शिल्प' या पुस्तकात केले आहे.




जिजाऊमातेने बालशिवाजींची जडणघडण केली. अशा कर्तृत्ववान जिजाबाईंचे चरित्र 'राजमाता जिजाऊ'

या प्रकरणामध्ये सारांशरूपाने रेखाटण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. तसेच शिवरायांच्या जीवनात ज्या आठ राण्या आल्या त्यांच्या जीवनकार्याचे वर्णन 'राणीवसा' या प्रकरणात येते. 'महाराणी येसूबाई' या प्रकरणात त्यांची स्वराज्यनिष्ठा व दूरदृष्टी कशी दिसून येते याचे वर्णन केले आहे. संकटसमयी संभाजीराजांना दिलेल्या सल्ल्यामुळे त्यांच्या कार्यात मदत कशी झाली, याचेही वर्णन आले आहे.

ताराबाई, उमाबाई दाभाडे, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी युद्धभूमीवर शत्रूला तोंड कसे दिले. दर्याबाई निंबाळकर, पेशव्यांच्या पत्नी गोपिकाबाई, रमाबाई, गंगाबाई यांनाही व्यक्तिगत सुख-दु:खाबरोबरच मराठी दौलतीच्या वाटचालीत आपली भूमिका कशी पार पाडावी लागली, याचीही माहिती पुस्तकात देण्यात आली आहे.

दौलतीचा कारभार करताना आहिल्याबाईंना तीस वर्षे वैयक्तिक दु:खांना सामोरे जावे लागले. या सगळी दु:खं बाजूला सारून, उत्कृष्ट कार्य करून त्या 'साध्वी पुण्यश्लोक अहिल्या' कशा झाल्या याचा थोडक्यात आढावा घेतला आहे, 'अहिल्याबाई होळकर' या प्रकरणात. तसेच पुतळाबाई आणि रमाबाई यांच्या पतिनिष्ठेचे वर्णनही वाचायला मिळते.

या सर्व व्यक्तिचरित्रांपैकी 'राणी लक्ष्मीबाई' यांचे चरित्र वाचताना त्यांची धाडसी वृत्ती, चिकाटी, येईल त्या प्रसंगाला न घाबरता शौर्याने सामोरे जाण्याची वृत्ती व शेवटी रणांगणावर त्यांना आलेले वीरोचित मरण, आपल्या मनाला चटका लावून जाते; पण अभिमानही वाटल्याशिवाय राहत नाही. वयाच्या चौदाव्या वर्षी गंगाधरराव यांच्याशी विवाह झाल्यानंतर, आपल्या मुलाच्या आणि पतीच्या निधनानंतर शोक करत न बसता ही वीरांगना आपला दत्तक मुलगा 'दामोदर' याला घेऊन ब्रिटिशांच्या कटू कारस्थानांना तोंड देण्यास सज्ज झाली होती. यातच तिला वीरमरण आले. हे वीरमरण येताना-सुद्धा ती मोठ्या शौर्याने अखेरच्या क्षणापर्यंत लढली आणि जेव्हा आपला देह आपल्याला साथ देत नाही, हे लक्षात आले तेव्हा तिने आपल्या अनुयायांना आपला देह शत्रूच्या हातात पडता कामा नये, त्याला अग्नी द्या, असे सांगितले. अशा या वीरांगनेची गर्जना, 'मै अपनी झाँसी नहीं दूँगी'।' ही आजही अनेक स्त्रियांना आपल्या कामात प्रेरणा देणारी अशी आहे. राणी लक्ष्मीबाईच्या मरणाविषयी अनेक हकिकती उपलब्ध आहेत, त्यांचा उल्लेखही या पुस्तकात

आला आहे.

या पुस्तकातील स्त्रिया इतिहासकालीन असल्याने काही ठिकाणी ऐतिहासिक संदर्भांची पुनरावृत्ती झाल्यासारखे वाटते; पण ते येणेसुद्धा गरजेचे आहे. साध्या सोप्या भाषेत ही चरित्रे आपल्याला वाचायला मिळतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, इतिहासकाळातील थोर महिला विभूतींच्या जीवनकार्याचे सार अल्पांशाने वाचकांपुढे मांडण्याचा प्रयत्न लेखक गोपाळ देशमुख यांनी केला आहे, तो कौतुकास्पद आहे.

**– दै. लोकसत्ता**

◆

## नवी संहिता... नवा आशय...

## अंतर्नाद | **रमेश जोशी**




बाजीरावने ऐकला 'अंतर्नाद', त्यामुळे त्याला दिसलं 'आकाश'... महादेवसारख्या सद्वर्तनी व्यक्तीने घातलं एका जालीम गुन्हेगाराला जेवायला...एका आजोबांनी 'धर्म' या विषयावर साधला अतिरेक्यांशी संवाद... तर जीवनाबद्दल निराश झालेल्या इंजिनिअर श्रीयशला युद्धामुळे हानी झालेल्या गावातून मिळाली स्फूर्ती... सदानंदसारख्या कॉम्प्युटर तज्ज्ञाला निर्णयाची चतु:सूत्री कॉम्प्युटरला फीड केल्यानंतर मिळाले आश्चर्यकारक रिझल्ट्स...तर श्रीकांतसारख्या प्रामाणिक अधिकाऱ्याने जगदाळेसारख्या कामचुकार, राजकारणी सुपरवायझरवर उलटवला त्याचा डाव... तर अनेक माणसं, त्यांच्या अनेक समस्या...माणसाच्या मानसिकतेतून उद्भवलेल्या...माणसाने जर मूल्यं अंगी बाणवली, सद्विचारांची कास धरली, संयम राखला तर तो निश्चितच त्या समस्येवर मात करू शकतो, असाच काहीसा संदेश देणाऱ्या कथांचा हा संग्रह...सकारात्मकतेचं महत्त्व अधोरेखित करणारा...मानवी मनाची नकारात्मकता दर्शविणारा आणि त्याचा उताराही सांगणारा...

**किंमत : २६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## १६ मार्च ते १५ एप्रिल २०२३ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ मार्च दरम्यान खास सवलत**

**१६ मार्च - झोई जेनी यांचा जन्मदिन**

‘आकाश बदलताना’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

**१७ मार्च - बाळ भागवत यांचा जन्मदिन**

‘देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर!’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

**१७ मार्च - फ्रँक गिलब्रेथ यांचा जन्मदिन**

‘चीपर बाय दी डझन’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**१९ मार्च - आयर्विंग वॅलेस यांचा जन्मदिन**

‘सेकंड लेडी’, ‘द गेस्ट ऑफ ऑनर’, ‘द मिरॅकल’, ‘द सेव्हन्थ सिक्रेट’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२४५/- । सवलत किंमत ६९९/-**

**२० मार्च - विल्यम डॅलरिंपल यांचा जन्मदिन**

‘व्हाइट मुघल्स’, ‘रिटर्न ऑफ अ किंग’, ‘अराजक’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८४०/- । सवलत किंमत १०५९/-**

**२२ मार्च - सुभाष दांडेकर यांचा जन्मदिन**

‘चाळिशीनंतरची वाटचाल’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४९/-**

**२३ मार्च - डॉ. डेव्हिड जे. श्वार्त्झ यांचा जन्मदिन**

'द मॅजिक ऑफ थिंकींग बिग', 'द मॅजिक ऑफ थिंकिंग सक्सेस' 'द मॅजिक ऑफ गेटिंग व्हॉट यू वॉन्ट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८४०/- । सवलत किंमत ५३०/-**

---

**२५ मार्च - व. पु. काळे यांचा जन्मदिन**

व. पु. काळे यांच्या सर्व पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८३७५/- । सवलत किंमत ५०२५/-**

---

**२५ मार्च - टॉम मोनाघन यांचा जन्मदिन**

'पिझ्झा टायगर' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४२०/- । सवलत किंमत २२९/-**

---

**२६ मार्च - राहुल गोखले यांचा जन्मदिन**

'विज्ञानातील सरस आणि सुरस' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-**

---

**२६ मार्च - व्हिक्टर फ्रॅन्कल यांचा जन्मदिन**

'अर्थाच्या शोधात' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १३४/-**

---

**२६ मार्च - राजशेखर हिरेमठ यांचा जन्मदिन**

'मराठी व्याकरण परिचय' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ८९/-**

---

**२६ मार्च - उमेश कदम यांचा जन्मदिन**

'एक होता मित्र', 'केवळ मैत्रीसाठी', 'संहार', 'उद्ध्वस्त', 'स्थलांतर', 'झांझिबारी मसाला' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२००/- । सवलत किंमत ७५६/-**

---

**२९ मार्च - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचा जन्मदिन**

'शेतकऱ्याचा आसूड : महात्मा जोतिराव फुले' या पुस्तकावर विशेष सवलत

---

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९६/-**

**२९ मार्च - विवेक शानभाग यांचा जन्मदिन**

'घाचर घोचर' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**३० मार्च - मणी भौमिक यांचा जन्मदिन**

'परमेश्वर : एक सांकेतिक नाव' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १५९/-**

**३० मार्च - फिलिप गूल्ड यांचा जन्मदिन**

'आयुष्याचा अंतिम संस्कार' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत ११९/-**

**खालील संचांवर १ ते १५ एप्रिल दरम्यान खास सवलत**

**१ एप्रिल - सुधा पाटील यांचा जन्मदिन**

'बाल परिचर्या' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २०९/-**

**१ एप्रिल - सुरेश वसंत नाईक यांचा जन्मदिन**

'कविता दोघांची...', 'या सुखांनो' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३३०/- । सवलत किंमत १९९/-**

**३ एप्रिल - किशोर पवार यांचा जन्मदिन**

'आपली सृष्टी' मालिकेतील १० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११००/- । सवलत किंमत ६४९/-**

**४ एप्रिल - सौरभ दुग्गल यांचा जन्मदिन**

'आखाडा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-**

**५ एप्रिल - जोसेफ लेलिव्हेल्ड यांचा जन्मदिन**

'महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत २९९/-**

---

**५ एप्रिल - व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्मदिन**

व्यंकटेश माडगूळकर यांच्या ४१ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५८८५/- । सवलत किंमत ३५३१/-**

---

**७ एप्रिल - जागतिक आरोग्यदिन**

संच १ - 'आरोग्यासाठी योग', 'चला जाणून घेऊ या! आहार आणि आरोग्य', 'चला जाणून घेऊ या! शाकाहार', 'चिकन सूप फॉर द सोल अस्थमा', 'चिकन सूप फॉर द सोल बॅक पेन', 'हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र', 'हृदयविकार निवारण', 'चाळिशीनंतरची वाटचाल', '२० मिनिटे तंदुरुस्तीसाठी', 'डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १६८५/- । सवलत किंमत १०९९/-**

संच २ - 'फिट फॉर ५०+ फॉर मेन', 'फिट फॉर ५०+ फॉर विमेन', 'रूप करा सुरूप', 'गर्भसंस्कार', 'मिरॅक्युलस इफेक्ट्स ऑफ ॲक्युप्रेशर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०८०/- । सवलत किंमत ७०९/-**

---

**७ एप्रिल - अतुल कहाते यांचा जन्मदिन**

'ॲडॉल्फ हिटलर','अमेरिकी राष्ट्रपती', 'अंतराळ स्पर्धा','हिलरी क्लिंटन', 'रुपेरी सिंधू','स्टीव्ह जॉब्ज : एक झपाटलेला तंत्रज्ञ!', 'वॉरन बफे', 'वॉरन बफेच्या यशाचे ५० मंत्र', 'गुंतवणूक भान', 'बेंजामिन ग्रॅहॅम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४५१५/- । सवलत किंमत २९३५/-**

---

**८ एप्रिल - रणजित देसाई यांचा जन्मदिन**

रणजित देसाई यांच्या ४२ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७१२५/- । सवलत किंमत ४९८८/-**

---

**१० एप्रिल - वर्षा अडालजा यांचा जन्मदिन**

'अणसार' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २०९/-**

---

**१० एप्रिल - एच.व्ही. सरदेसाई यांचा जन्मदिन**

'धन्वंतरी घरोघरी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १२९/-**

---

**११ एप्रिल - डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा जन्मदिन**

'भारतीय साहित्यिक', 'खाली जमीन वर आकाश', 'समकालीन साहित्यिक', 'वाङ्मय विचार' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८५०/- । सवलत किंमत ४९९/-**

`IN BETWEEN' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २३९/-**

---

**११ एप्रिल - महात्मा फुले यांचा जन्मदिन**

'शेतकऱ्याचा असूड', 'महात्मा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६१०/- । सवलत किंमत ३६६/-**

---

**१२ एप्रिल - छाया महाजन यांचा जन्मदिन**

'कॉलेज', 'मानसी', 'एकादश कथा', 'यशोदा', 'मुलखावेगळा', 'अज्ञात' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०३०/- । सवलत किंमत ५९९/-**

---

**१३ एप्रिल - जालियनवाला बाग हत्याकांड दिन**

'जालियनवाला बाग' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३३९/-**

---

**१४ एप्रिल - द. मा. मिरासदार यांचा जन्मदिन**

द. मा . मिरासदार यांच्या २५ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३६५०/- । सवलत किंमत २१९०/-**

---

**१४ एप्रिल - आशा आपराद यांचा जन्मदिन**

'भोगले जे दुःख त्याला...' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

**१४ एप्रिल - डॉ. रवींद्र ठाकूर यांचा जन्मदिन**

'व्हायरस', 'महात्मा', 'धर्मयुद्ध' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०९५/- । सवलत किंमत ६४९/-**

'MAHATMA JYOTIRAO PHULE' (English) या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ७९५/- । सवलत किंमत ५४९/-**

**१५ एप्रिल - जेफ्री आर्चर यांचा जन्मदिन**

'अ प्रिझनर ऑफ बर्थ', 'ॲन्ड देअरबाय हँग्ज अ टेल', 'बी केअरफुल व्हॉट यू विश फॉर', 'बेस्ट केप्ट सीक्रेट', 'कॅट ओ'नाईन टेल्स', 'फॉल्स इम्प्रेशन', 'केन अँड एबल', 'नॉट अ पेनी मोअर, नॉट अ पेनी लेस', 'ओन्ली टाइम विल टेल', 'पाथ्स ऑफ ग्लॉरी', 'सन्स ऑफ फॉर्च्यून', 'द सिन्स ऑफ द फादर', 'टू कट अ लाँग स्टोरी शॉर्ट', 'ट्वेल्व्ह रेड हेरिंग्ज', 'अ क्विव्हर फुल ऑफ ॲरोज', 'अ ट्विस्ट इन द टेल', 'मायटिअर दॅन द स्वोर्ड', 'कमेथ् द अवर', 'द इलेव्हन्थ कमान्डमेन्ट', 'शल् वी टेल द प्रेसिडेंट?', ऑनर अमंग थीव्हज', 'द प्रॉडिगल डॉटर', 'टेल टेल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १००९०/- । सवलत किंमत ६०५४/-**

**१५ एप्रिल - रवीन्द्र बागडे यांचा जन्मदिन**

'बोचकं', 'गटुळं' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १७९/-**

**१५ एप्रिल - डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली यांचा जन्मदिन**

'कृष्णदेवराय' या पुस्तकावर विशेष सवलत


**मूळ किंमत २७०/- । सवलत किंमत १५९/-**

◆

## नवीन सुधारित आवृत्ती...

# बंद दरवाजा

**लक्ष्मण माने**





भटक्या-विमुक्तांच्या भळभळत्या जखमांचं
आणि त्यासाठी उभारलेल्या चळवळींचं
अभ्यासपूर्ण विश्लेषण

**किंमत : ३३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# भटक्याचं भारूड

**लक्ष्मण माने**




भटक्या-विमुक्तांच्या शोषणावर, वर्णव्यवस्थेवर,
सरकारच्या अनास्थेवर परखड भाष्य करणाऱ्या
भाषणांचा संग्रह.

**किंमत : २७०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**



# कोल्हापूर येथे ‘धडाकेबाज’ व्यक्तिमत्त्वाची ‘सही रे सही’ मुलाखत



क्रॉसवर्ड, सिटीप्राईड, कोथरूड येथे रंगली गप्पांची मैफल

## महेश कोठारे यांनी चाहत्यांशी साधला दिलखुलास संवाद










**'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023**
**RNI. No. MAHMAR/2000/02739**
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/03/2023 Posting Date : 11/03/2023

## आवर्जून वाचावे...






























**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,